दैनिक

अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक

# राष्ट्र सह्याद्री

● संपादक : काकासाहेब नवले ● RNI No. MAHMAR /2019/82605 ● वर्ष ६ वे ● अंक ५३ ● सोमवार, ०२ डिसेंबर २०२४ ● www.rashtrasahyadri.com ● पाने ८ ● मूल्य रु. ४.००

## शरदचंद्र पवार राष्ट्रवादीच्या मुख्य प्रतोदपदी आ. रोहित पाटील



**पुणे :** एकीकडे एकमुखी सत्ता आली असताना सरकार स्थापनेसाठी विलंब होत आहे. दुसरीकडे पराभवाचा मार खाल्ल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षा'ने जोमाने पुनर्बांधणी सुरू केली आहे. पक्षाचे मुख्य प्रतोद म्हणून दिवंगत नेते आर.आर. आबांचे पुत्र आणि सर्वात तरुण आमदार रोहित आबा पाटील यांची निवड करण्यात आली. यासोबतच विधिमंडळ पक्षाचे गटनेते म्हणून जितेंद्र आव्हाड साहेब आणि प्रतोद म्हणून आमदार उत्तम जानकर साहेब यांची निवड झाली. आमदार रोहित पवार यांच्यासह राज्यभरातील नेत्यांनी त्यांचे अभिनंदन केले.

## काय म्हणता..!

धर्मेंद्र व्यास





## झापुक | zupuk

एस टी स्टँडवर असते
एक सोशिक स्मारक
त्याला पिळवटून टाकतात
तरीही ठरत नाही ते मारक
चरखात पिळून पिळून
त्याचा रस काढला जातो
शेवटी बिचारा चोथा
म्हणून फेकला जातो
सारेच त्याच्यावर
आनंदाने मारतात ताव
नवनाथ रसवंती त्याचे
ठेवतात नाव

नवनाथ कुताळ,
9422231825

# प्रत्येक जोडप्याला किमान तीन मुलं हवीत!

## लोकसंख्या शास्त्राचा हवाला देत डॉ. मोहन भागवतांचे विधान





प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नागपूर :** लोकसंख्या शास्त्र सांगते की लोकसंख्या वाढीचा दर २.१ पेक्षा कमी व्हायला नको. आता पॉईंट एक तर माणूस जन्मत नाही. त्यामुळे दोन पेक्षा जास्त म्हणजे कमीत कमी तीन अपत्य असावेत, असे अत्यंत महत्त्वाचे विधान करत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी लोकसंख्येबाबत चिंता व्यक्त केली आहे.

नागपुरात कठाळे कुल संमेलनात बोलताना सरसंघचालकांनी हे विधान केले आहे. या संमेलनात मोहन भागवत यांच्या आधी वक्तव्य करणाऱ्या व्यक्तींनी सध्या अनेक तरुण दांपत्य एकही अपत्य जन्माला घालण्यास तयार नाही, असा उल्लेख करत चिंता व्यक्त केली होती. त्याच मुद्द्याला पुढे घेऊन जात सरसंघचालकांनी अत्यंत महत्त्वाचे विधान केले. नक्कीच सध्या लोकसंख्या कमी होत आहे, हा चिंतेचा विषय आहे. लोकसंख्या शास्त्र सांगते **(पान ४ वर)**

### हिंदूंच्या संख्येत ७.८ टक्क्यांनी घट

पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार परिषदेने १९५० ते २०१५ या काळात भारतात हिंदू बहुसंख्य होते, असं स्पष्ट केले आहे. तर दुसरीकडे आता हिंदूंची लोकसंख्येत ७.८ टक्क्यांनी घट झाल्याचेही स्पष्ट केले आहे. तर दुसऱ्या बाजूला भारताच्या शेजारील राष्ट्रांमध्ये त्या देशातील प्रमुख धर्मियांची लोकसंख्या वाढत असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. शिवाय, यूपीएससीत मराठी यशवंतांचा टक्का घसरल्याचेही समोर आले आहे.

### मुस्लीम लोकसंख्येचा टक्का वाढला

१९५० साली भारतातील हिंदूंच्या लोकसंख्येचा वाटा ८४ टक्के होता. तो २०१५ साली ७८ टक्क्यांपर्यंत कमी झाला आहे. तर मुस्लीमांचा १९५० मध्ये असलेला वाटा ९.८४ टक्के होता, तो मात्र, १४.०९ टक्क्यांवरती पोहोचला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या आर्थिक सल्लागार समितीने जगभरातील १६७ देशांत १९५० ते २०१५ या कालावधीत लोकसंख्येत होत असलेल्या बदलांचा अभ्यास केला आहे.

# हिवाळी अधिवेशन होणार पेपरलेस अन् डिजीटल

## १६ ते २१ डिसेंबरदरम्यान आयोजन; प्रश्नोत्तरे रद्द



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नागपूर :** येत्या ५ तारखेला राज्याच्या नव्या सरकारचा शपथविधी पार पडल्यानंतर १६ डिसेंबर ते २१ डिसेंबरपर्यंत राज्याचे हिवाळी अधिवेशन होणार आहे. हे अधिवेशन फक्त ५ दिवसांचे असेल. प्रश्न उत्तरांचा कालावधी नसल्यानं पहिले अधिवेशन कमी दिवसांचे असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे नव्या सरकारचे पहिले अधिवेशन पेपरलेस अन् डिजीटल होणार अशी चर्चा आता राजकीय वर्तुळात रंगली आहे.

विधानसभा निवडणुकांनंतर राजकीय वर्तुळात सत्ता स्थापनेच्या घडामोडी सुरु आहेत. राज्याच्या नव्या सरकारचा शपथविधी ५ डिसेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता होणार आहे. या शपथविधी सोहळ्याची जय्यत तयारी सुरु असतानाच **(पान ४ वर)**

### टेबलवरच येस, नो आणि अबस्टेन

अधिवेशनात प्रत्येक डेबलवर डिजीटल प्रणाली असणार आहे. त्यामुळे एखाद्या प्रस्तावावर सभागृहातील बहुमत कुणाकडे आहे ते पाहण्यासाठी आता मुंबई प्रमाणे नवीन प्रणाली असेल. हात उंचावून किंवा व्होटिंग पॅडऐवजी आता टेबलवरच येस, नो आणि अबस्टेन म्हणजे गैरहजर अशी बटने उपलब्ध करण्यात आली आहेत. ही व्यवस्था मुंबईत दोन अधिवेशनापूर्वी करण्यात आली आहे. तसेच नव्या संसद भवनाच्या सेन्ट्रल विस्टा आणि केरळ येथील विधी मंडळ सभागृहात हे तंत्रज्ञान वापरण्यात आले आहे.

### विरोधकांचा कस लागणार

दरम्यान, विधानसभा निवडणुकीत जनतेने महायुतीला स्पष्ट बहुमत दिले असून तब्बल २३० जागा जिंकत पुन्हा एकदा सत्ता मिळवली आहे. या निवडणुकीत महाविकास आघाडीचा धुव्वा उडाला असून विरोधकांना फक्त ४६ जागा जिंकता आल्या आहेत. त्यामुळे पहिल्याच अधिवेशनामध्ये विरोधीपक्ष नेता नसेल. एकीकडे २३० सत्ताधारी आमदारांची फौज असताना ४६ विरोधी बाकावर बसणाऱ्या आमदारांचा चांगलाच कस लागणार असल्याचे दिसत आहे.

## महत्वाचे...

### मनसे जिल्हाध्यक्षच्या भावावर तलवारीने वार

**पालघर :** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत मनसेला एकही जागा मिळाली असून, मोठा पराभव झाला आहे. एकीकडे पक्षाकडून पराभवाची कारणं शोधली जात असताना दुसरीकडे अंतर्गत वाद समोर येत आहेत. पालघरमध्ये मनसेचे जिल्हाध्यक्ष समीर मोरे यांचे भाऊ आतिश मोरे यांच्यावर काहीजणांनी जीवघेणा हल्ला केला आहे. त्यांच्यावर सध्या रुग्णालयात उपचार सुरु आहेत. कुटुंबाने मनसे नेते अविनाश जाधव यांच्यावर आरोप केले असून, अंतर्गत वादातून हल्ला झाल्याची चर्चा रंगली आहे.

### पुरंदर विमानतळ 'समृद्धी'च्या दिशेने

**पुणे :** पुरंदर तालुक्यातील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळाचे भूसंपादन समृद्धी महामार्गाच्या धर्तीवर स्वेच्छा खरेदीने करण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. स्वेच्छा खरेदीने भूसंपादन केल्यास प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळेल, त्यांचे नुकसान होणार नाही. तातडीने भूसंपादन होईल. त्यामुळे राज्य सरकारच्या निर्णयानुसार शेतकऱ्यांशी संवाद साधून तातडीने विमानतळाचा प्रश्न मार्गी लावण्यात येईल, अशी ग्वाही पुरंदर तालुक्यातील नवनिर्वाचित आमदार विजय शिवतारे यांनी दिली.

# ५३ कोटी द्या, ६३ जागांचे ईव्हीएम हॅक करतो..!

## हॅकर शुजाने नेत्यांना दिले आमिष; गुन्हा दाखल




प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** ५३ कोटी रुपये दिले तर ६३ जागांचे ईव्हीएम हॅक करू, राजकीय नेत्यांना अशी ऑफर देणाऱ्या सय्यद शुजाविरोधात अखेर केंद्रीय निवडणूक आयोगाने गुन्हा दाखल केला आहे. दक्षिण मुंबईतील सायबर पोलिस ठाण्यात हा एफआयआर दाखल करण्यात आला. भारतीय न्याय संहिता (बीएनएस) आणि आयटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता.

१४ नोव्हेंबरला सय्यद शुजाचा एक व्हिडिओ व्हायरल झाला होता. यामध्ये तो महाराष्ट्र निवडणुकीत वापरण्यात आलेले ईव्हीएम हॅक करू शकतो असा दावा करत होता. ५३ कोटी रुपये दिले तर ६३ जागांचे ईव्हीएम हॅक करू, अशी ऑफरही त्यांनी नेत्यांना दिली होती. दुसरीकडे, महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी (सीईओ) म्हणाले की, ईव्हीएम हॅकिंगचे दावे निराधार, खोटे आणि सिद्ध न झालेले आहेत.

महाराष्ट्र निवडणुकीदरम्यान सय्यद शुजा यांनी निवडणूक जिंकण्यासाठी काही नेत्यांशी संपर्क साधला होता. अमेरिकेच्या संरक्षण विभागाच्या तंत्रज्ञानाचा **(पान ४ वर)**

### निवडणूक आयोगाकडून थेट कारवाई

२०१९ मध्येही निवडणूक आयोगाने शुजा यांच्याविरोधात दिल्लीत एफआयआर दाखल केला होता. मात्र त्यानंतर या प्रकरणाबाबत कोणतीही अधिकृत माहिती मिळालेली नाही. तथापि, आयोगाने म्हटले होते की ईव्हीएम पूर्णपणे सुरक्षित आहेत, जे वायफाय किंवा ब्लूटूथसह कोणत्याही नेटवर्कशी कनेक्ट केले जाऊ शकत नाहीत.

# जुन्या वादातून भरदिवसा माजी उपसरपंचाचा खून



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**तळेगाव ढमढेरे :** ग्रामपंचायतचे माजी उपसरपंच व शिवसेना शिंदे गटाचे जिल्हा सल्लागार दत्तात्रय बंडू गिलबिले यांचा एका युवकाने जुन्या वादाच्या कारणातून भरदिवसा धारदार शस्त्राने हल्ला करुन गळ्यावर वार करत खून केल्याची घटना घडली आहे.

शिक्रापूर (ता. शिरुर) ग्रामपंचायतचे माजी उपसरपंच व शिवसेना शिंदे गटाचे जिल्हा सल्लागार दत्तात्रय बंडू गिलबिले यांचे व त्यांच्या घराजवळील पप्पू गिलबिले या युवकाचे काही दिवसांपूर्वी दत्तात्रय व पप्पूच्या पत्नी या दोघांमध्ये मोबाईलवर झालेल्या मेसेजच्या कारणातून वाद झालेला होता, तर आज दतात्रय गिलबिले हे दुपारी साडे बारा वाजण्याच्या सुमारास त्यांच्या घराच्या खाली बसलेले असताना अचानकपणे आलेल्या पप्पू गिलबिले या युवकाने धारदार चाकुने दत्तात्रय गिलबिले यांच्या मानेवर वार करत जखमी केले, दरम्यान नागरिकांनी दत्तात्रय गिलबिले यांना उपचारासाठी शिक्रापूर येथील खाजगी **(पान ४ वर)**

# दोन मराठा उपमुख्यमंत्री असताना पुन्हा मुख्यमंत्री मराठाच का हवा?

## आरएसएसची भूमिका : जातीच्या आधारावर मुख्यमंत्री निवड करणे अयोग्य

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** मुख्यमंत्री पदासाठी जातीय समीकरण पुढे करत मराठा, ओबीसी नेत्यांची नाव पुढे येत असल्याने संघ परिवारात नाराजीची चर्चा आहे. दोन मराठा उपमुख्यमंत्री असताना, पुन्हा मुख्यमंत्री मराठा असावा हा अट्टाहास कशासाठी असा सवाल संघ परिवारातून विचारला जात आहे. केवळ जातीच्या आधारावर मुख्यमंत्री निवड करण अयोग्य आहे. याचा परिणाम संघाच्या कार्यकर्त्यांवर होऊ शकतो अशा शब्दात संघाने आपली नाराजी व्यक्त केलीय.

राज्यात नव्या मुख्यमंत्र्यांचा शपथविधी पाच डिसेंबरला होणार आहे. मुख्यमंत्रिपदासाठी देवेंद्र फडणवीस यांचं नाव जवळपास निश्चित झालं आहे. मात्र यावर स्पष्टपणे अद्याप कुणीही माहिती दिलेली नाही. यातच राष्ट्रीय स्वयंसेवक संघ मुख्यमंत्री कोण होणार यावर होत असलेल्या चर्चा आणि जातीय समीकरणांच्या आधारावर निर्णय घेण्याच्या शक्यतेवरून भाजपवर नाराज आहे.

आरएसएसने देवेंद्र फडणवीस यांना मुख्यमंत्री बनवावं असं म्हटलंय. विधानसभा निवडणुकीत त्यांना महायुतीला मोठा विजय मिळवून दिला आहे. त्यामुळे आरएसएसची पहिली पसंती फडणवीस आहेत. मात्र गेल्या काही दिवसांपासून भाजपमध्ये एक गट मुख्यमंत्रिपदासाठी इतर दावेदारांचे नाव पुढे करत आहे.

राज्यात विनोद तावडे, चंद्रशेखर बावनकुळे, चंद्रकांत पाटील आणि मुरलीधर मोहोळ यांचीही नावे चर्चेत आहेत. विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, मुरलीधर मोहोळ हे मराठा समाजातील आहेत तर बावनकुळे ओबीसी चेहरा आहेत. या संभाव्य नावांमुळे जातीय समीकरणांच्या चर्चा रंगल्या आहेत. मराठा आणि ओबीसी समाजाने विधानसभा निवडणुकीत महत्त्वाची भूमिका बजावली. या नेत्यांच्या समर्थकांचं म्हणणं आहे की, मुख्यमंत्री निवडताना या गोष्टीही लक्षात घेतल्या पाहिजेत.

मुख्यमंत्र्याच्या खुर्चीबाबत काही स्पष्टता नसल्यानं राष्ट्रीय स्वयंसेवक संघ नाराज आहे. आरएसएसने निवडणुकीवेळी फडणवीस यांचे समर्थन केले होते. आरएसएसच्या योजनेंतर्गत ३ हजार स्वयंसेवकांनी प्रत्येक जिल्ह्यात मोहीम चालवून महायुतीच्या विजयात मोलाची भूमिका बजावली. आरएसएसच्या फ्रंटल संघटनेपैकी असलेल्या **(पान ४ वर)**

# रामपूर कोकरे येथील महिलांनी धारण केला दुर्गेचा अवतार

## गोदावरी पट्ट्यातील दारुचे दुकान जाळले, बाटल्या आडव्या केल्या



दारूच्या व्यसनामुळे आमच्या कुंटुबातील कर्ता पुरुष गेल्याने मी रोजंदारी करून लहान लेकरांसह घरातील वृद्ध असलेल्या व्यक्तीचा सांभाळ तारेवरची कसरत करन करते. यापूर्वी गावात अवैध दारुची दुकाने होती. ते बंद असले तरी गावाच्या शेजारी अनेकांनी अवैध दारूची दुकाने थाटल्याने अबालवृद्धासह मुलेदेखील व्यसनाधिन होत आहेत. आमच्या कुंटुबातील कर्ता पती गेल्याचे दुःख असून इतर महिलांवर अशी वेळ येऊ नये. अवैध दारू विक्री कायमची बंद करावी. – गं. भा. रेखा जाधव

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**वैजापूर :** श्रीरामपूर तालुक्यातील गोदावरी पात्रालगत असलेल्या गोवर्धन हद्दीमध्ये अवैधरित्या दारूचा व्यवसाय करणाऱ्या दुकानात अचानक रामपूर येथील सुमारे ८० ते ९० महिलांनी रुद्रावतार घेत गोवर्धन येथील ओढ्यातील झोपडीवजा दुकान जाळले. वीरगाव पोलिस स्टेशनच्या हद्दीत असलेल्या एका हॉटेलच्या पाठीमागील उसातील अवैध दारूच्या सुमारे १०० पेक्षा अधिक दारूच्या बाटल्या आक्रमक पवित्रा घेतलेल्या महिलांनी फोडून टाकल्या.

याबाबतची माहिती अशी की, गेल्या तीन-चार महिन्यांपासून रामपूर (कोकरे) येथील महिलांनी दारूबंदीसाठी ग्रामसभा घेत पोलीस अधीक्षक तसेच दारू उत्पादन शुल्कचे अधीक्षक यांना महिलांनी स्वःत नगर येथे जाऊन लेखी स्वरूपात पत्र दिले होते. गोदावरी भागातील दारू बंद करण्याची विनंती केली होती. जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच दारू उत्पादन शुल्कचे अधिकारी यांनी सुरुवातीच्या काळात काही ठिकाणी छापेमारी केल्याने दारू बंद झाली होती. त्यानंतर रामपूर गाववगळता लगतच्या गावांमध्ये अवैद्य दारु व्यवसाय पुन्हा जोमाने सुरू झाला. रामपूर येथील लहान मुलांसह पुरुषमंडळी दारूच्या आहारी गेली. मोलमजुरीचे काम केल्यानंतर रात्रीच्या वेळी पती-मुले दारू पिऊन धिंगाणा घालत होते. त्यामुळे प्रत्येक कुंटूबात कलह निर्माण होत होता. अखेर काल (दि. १) सकाळी नऊच्या सुमारास रुद्रावतार घेत महिलांनी प्रथमतः गोवर्धन हद्दीतील ओढयात काटेरी कुंपणात सुरू असलेले अवैध दारूच्या दुकानावर हल्ला चढवला. संबंधित दारू विक्री करणाऱ्या दुकानदाराला **(पान ४ वर)**

### ... तर आत्मदहन करू

सरपंच नितीन शिंदे व ग्रामपंचायत सदस्य अमित कोकरे यांनी सांगितले कि आमच्या गावात दारूबंदी झाली असून गावालगत काहींनी अवैध दारूची दुकाने उघडल्याने आमची तरुण पिढी तसेच अबालवृद्ध पुन्हा व्यसनाच्या आहारी जाऊन दिवसभराची कमाई दारूमध्येच घालत आहेत. यामुळे मजुरी काम करून घरी आलेल्या महिला-मातांना रोजच त्रास होत असून गावालगत असलेले श्रीरामपूर व वैजापूर या दोन्ही तालुक्याच्या पोलिस स्टेशन हद्दीत गावालगतचे अवैध दारू व्यवसाय त्वरीत बंद करण्यात यावे यासाठी जिल्हा पोलिस अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क विभाग अधिक्षक यांना बुधवारी महिलांसह आजच कारवाई करा अन्यथा मंत्रालयासमोर आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे.

## संपादकीय

# सामाजिक बंधने, नितीनियम समाज माध्यमांनाही हवीत

१६ वर्षांखालील मुलांना सामाजिक माध्यमांचा (सोशल मिडियाचा) वापर करण्यावर बंदी घालण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय ऑस्ट्रेलियाने घेतला आहे. २८ नोव्हेंबर या दिवशी ऑस्ट्रेलियाच्या संसदेमध्ये यासाठी 'द सोशल मिडिया मिनीमम ऐज बिल' हा कायदा संमत करण्यात आला. या कायद्यान्वये फेसबुक, इन्स्टाग्राम, टिक-टॉक, स्नॅपचॅट या सामाजिक माध्यमांचा १६ वर्षांखालील मुलांनी वापर करण्यावर बंदी घातली. वर्ष २०२५ पासून ऑस्ट्रेलियामध्ये हा कायदा लागू होणार आहे. विशेष म्हणजे या कायद्याच्या चाचपणीसाठी ऑस्ट्रेलिया सरकार १ सहस्र २०० तज्ञांची नियुक्ती करणार आहे. या तज्ञांद्वे ही चाचपणी जानेवारी ते मार्च २०२५ या कालावधीत होईल. १६ वर्षांखालील मुलांनी ऑस्ट्रेलियामध्ये वरील सामाजिक माध्यमांचा वापर न करण्याचे दायित्व या सामाजिक माध्यमांचेच रहाणार आहे. या कायद्याचे उल्लंघन केल्यास संबंधित सामाजिक माध्यमांना २७५ कोटी रुपये इतका दंड ठोठावला जाणार आहे. सामाजिक माध्यमांच्या अतिरेकी वापरामुळे ऑस्ट्रेलियामध्ये जी परिस्थिती ओढवली आहे, त्यापेक्षा भारतातील स्थिती वेगळी नाही. ऑस्ट्रेलिया किंवा भारतच नव्हे, तर 'सामाजिक माध्यमांचा अतीवापर' जगासाठी डोकेदुखी झाली आहे. सामाजिक माध्यमांतून झपाट्याने फोफावत असलेली गुन्हेगारी पहाता येत्या काही वर्षांत ही जागतिक समस्या होण्याची शक्यता आहे. या समस्येवर कायदा करणारा ऑस्ट्रेलिया हा जगातील पहिला देश असला, तरी येत्या काळात जगातील अनेक देशांना यासाठी कायदा करावा लागेल, हे निश्चित आहे.

ऑस्ट्रेलियाप्रमाणे भारत, फ्रान्स, जर्मनी, बेल्जियम, नॉर्वे आदी देशांमध्येही सामाजिक माध्यमांवर नियंत्रण आणण्यासाठी पावले उचलण्यात आली आहेत. याचे कारण सामाजिक माध्यमांचा अतीवापर हा केवळ व्यक्तीगत विषय राहिलेला नाही. त्याचे समाज आणि देश विघातक परिणाम लक्षात आल्यावर या देशांनी सामाजिक माध्यमांवर बंधने घालण्यासाठी पावले उचलली आहेत. सामाजिक माध्यमांवरून जशी जीवन उपयोगी आणि सर्वच क्षेत्रांतील ज्ञानवर्धक माहिती उपलब्ध होते, तसेच गुन्हेगारी, अश्लील यांसारखी समाजविघातक माहितीही सहजरित्या उपलब्ध होते. बाँब कसे सिद्ध करावेत ?, हत्या कशी करावी ?, यांसह अश्लील-व्यभिचार पसरवणारे व्हिडिओ आणि त्याविषयीची माहिती सामाजिक माध्यमांवर मोठ्या प्रमाणात प्रसारित होत आहे. सध्या तर 'रिल्स'च्या नावाने अश्लील आणि निरर्थक व्हिडिओ प्रसारित करण्याची स्पर्धाच चालू आहे. अवघ्या १ मिनिटाच्या असलेल्या या 'रिल्स' लाखोंच्या संख्येने पाहिल्या जातात.

चांगल्या व्हिडिओंपेक्षा अश्लील व्हिडिओंचा प्रसार 'रिल्स'च्या माध्यमातून जलद गतीने चालू आहे. सद्यःस्थितीत स्मार्टफोन आणि इंटरनेट हे गरिबांपासून श्रीमंतांपर्यंत अन् बालकांपासून वृद्धांपर्यंत सहज उपलब्ध झाले आहे. युवावर्गामध्ये अश्लीलता, बलात्कार, व्यभिचार, हिंसा यांना प्रोत्साहन देणार्‍या सामाजिक माध्यमांवरील या व्हिडिओंमुळेच मागील काही वर्षांपासून जगातील गुन्हेगारी मोठ्या प्रमाणात वाढली आहे.

'ऑस्ट्रेलियन ब्युरो ऑफ स्टॅटिस्टीक्स', या ऑस्ट्रेलियातील शासकीय संस्थेने जून २०२३ मध्ये केलेल्या सर्वेक्षणामध्ये 'बालकांनी केलेल्या गुन्ह्यांपैकी ७७ टक्के गुन्हे सामाजिक माध्यमांतून प्रेरणा घेऊन केले', असा अहवाल सादर केला. देशाचे भवितव्य असलेली युवापिढी सामाजिक माध्यमांद्वे गुन्हेगारीकडे ओढली जाणे, हा देशासाठीचा धोका लक्षात घेऊनच ऑस्ट्रेलियाने बालकांना सामाजिक माध्यमे वापरण्यावर बंदी घातली. भारतामध्येही वर्ष २०२१ मध्ये 'राष्ट्रीय बाल अधिकार संरक्षण आयोगा'ने केलेल्या सर्वेक्षणात देशातील १० ते १४ वयोगटातील ३७ टक्के लहान मुले सामाजिक माध्यमांचा वापर करत असल्याचे आढळून आले. वर्ष २०२३ मध्ये भारतातील एका सर्वेक्षणानुसार देशात सामाजिक माध्यमांचा उपयोग करणारे प्रतिदिन ७ घंटे सामाजिक माध्यमांचा उपयोग करत असल्याचे आढळून आले. जो प्रकार ऑस्ट्रेलियामध्ये घडला, भारतातही तोच प्रकार चालू आहे. सामाजिक माध्यमांमध्ये अडकलेला युवावर्ग हा गुन्हेगारीकडे वळण्याचा धोका अधिक आहे. भारतातही सामाजिक माध्यमांवरील ऑनलाईन खेळ खेळण्यासाठी भ्रमणभाष न दिल्यामुळे मुलांनी पालकांची हत्या केल्याचे धक्कादायक प्रकारही भारतात झाले आहेत. काही वर्षांपूर्वी 'ब्ल्यू व्हेल' या ऑनलाईन खेळातून भारतासह जगातील अनेक मुलांनी आत्महत्या केल्याचे प्रकारही घडले. मागील काही वर्षांमध्ये भारतात बलात्कार आणि लैंगिक अत्याचार यांचे प्रकार मोठ्या प्रमाणात वाढले आहे. त्यामागे 'सामाजिक माध्यमांवरून होत असलेल्या अश्लीलतेचे प्रसारण', हे याला सर्वाधिक कारणीभूत आहे. पालकांनी ओरडल्यानंतर आत्महत्या करणे, शाळेत विद्यार्थ्यांमधील भांडणातून हत्या करणे, हे प्रकार म्हणजे सामाजिक माध्यमांचा परिणाम होय. सामाजिक माध्यमांमुळे मैदानी खेळांमध्येही मोठी घट झाली आहे. बालकांपासून युवावर्गापर्यंत सर्वजण मैदानी खेळापेक्षा सामाजिक माध्यमांमध्ये गुंतलेले पहायला मिळतात. सातत्याने व्हिडिओ बघणे, सतत ऑडिओ ऐकणे यांमुळे नागरिकांच्या प्रकृतीवरही या सर्वांचा विपरित परिणाम होत आहे.

स्वत:च्या आर्थिक लाभासाठी केवळ भारतातीलच नव्हे, तर जगभरात सामाजिक माध्यमांचा अधिकाधिक वापर व्हावा, यासाठी ही माध्यमे कार्यरत आहेत. सामाजिक माध्यमे ही केवळ मनोरंजनाचे माध्यम न रहाता प्रसिद्धी आणि पैसा मिळवण्याचे साधन झाले आहे. या माध्यमातून आर्थिक लाभ प्राप्त करण्यासाठी अश्लीलता, बीभत्सपणा, हिंसा यांचे चित्रण करण्याची चढाओढ समाजात लागली आहे. भारतामध्ये डिसेंबर २०१८ मध्ये गृह मंत्रालयाने सामाजिक माध्यमांवरील अनुचित प्रकारांना आळा घालण्यासाठी १० केंद्रीय एजन्सींची नियुक्ती केली आहे; परंतु सामाजिक माध्यमांवरून प्रसारित होणारी समाजविघातक माहिती आणि व्हिडिओ नियंत्रित करण्यासाठी विशेष कार्यवाही झालेली नाही. यासाठी भारताने ऑस्ट्रेलियाप्रमाणे सक्षम कायदा आणि त्यावर प्रभावी कार्यवाही करण्यासाठी कायदा करणे आवश्यक आहेच; परंतु केवळ कायद्याने हा प्रश्न सुटणारा नाही. मृगजळाप्रमाणे असलेल्या सामाजिक माध्यमांमधील योग्य काय आणि अयोग्य काय ? हे समजणारा समाजही घडवणे आवश्यक आहे. असा प्रतिभावंत समाज घडण्यासाठी तसे संस्कार कुटुंब आणि समाज यांमध्ये पेरणे आवश्यक आहे. माहितीजन्य ज्ञानासह विद्यार्थ्यांना संस्कारित करणे, हे यावरील प्रभावी उपाय ठरेल.

## मारुती मंदिराचा जीर्णोद्धार व मूर्ती प्राणप्रतिष्ठा कलशारोहण सोहळा

# देवगाव येथे दिड कोटींच्या मंदिराची उभारणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**घोडेगाव :** श्रीराम मंडळाच्या अथक परिश्रमातून व ग्रामस्थांच्या लोकवर्गणीतून व सहकार्यातून नेवासा तालुक्यातील देवगाव येथे हनुमान मंदिराचा जीर्णोद्धार व मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळा कार्यक्रमास आज पासून प्रारंभ होत असून हा कार्यक्रम पाच दिवस चालणार आहे.

देवगाव येथे गेल्या तीन वर्षापासून श्रीरामसेवा मंडळाच्या संकल्पनेतून तसेच देवगड संस्थांचे महंत भास्करगिरी महाराज यांच्या अधिपत्याखाली ग्रामस्थ व भाविकांच्या लोकवर्गणीतून देखणे, आकर्षक मंदिर उभे राहिले आहे. मंदिरासह परिसर सुशोभीकरणासाठी सुमारे दीड कोटी रुपयांपर्यंत खर्च आला असून मंदिरात महारुद्र मारुती, महागणपती व उमामहेश्वर मूर्ती प्राणप्रतिष्ठापणा व कलशारोहण सोहळा पार पडणार आहे. आज पासून शुक्रवारपर्यंत यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. आज सकाळी आठ वाजता शोभायात्रा, गणपती पूजन, दुपारी गृहयज्ञ, तर सायंकाळी मंगल आरती तसेच रात्री सात ते नऊ या वेळेत उद्धव महाराज मंडलिक यांचे कीर्तन होणार आहे त्यानंतर प्रसाद वाटप होणार आहे. मंगळवारी ३ डिसेंबर रोजी सकाळी महाभिषेक पूजन, तर सायंकाळी नाना महाराज सूर्यवंशी यांचे कीर्तन व भाविकांकडून महाप्रसाद, ४ डिसेंबर रोजी सायंकाळी प्रकाशानंदगिरी महाराज यांचे कीर्तन व भाविकांकडून महाप्रसाद, ५ डिसेंबर रोजी राहुल महाराज एलकर यांचे सायंकाळी कीर्तन व भाविकांकडून महाप्रसाद, तर ६ डिसेंबर रोजी सकाळी आठ वाजता देविदास महाराज म्हस्के ज्ञानेश्वर संस्थान नेवासा यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे.त्यानंतर महंत भास्करगिरी महाराज यांच्या हस्ते मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण व रुद्र स्वाहाकार महायज्ञ सोहळा होणार आहे. त्यानंतर महाप्रसाद वाटप करून सोहळ्याची सांगता होणार आहे. देवगाव येथे राम मंदिराचा यापूर्वीच जीर्णोद्धार करण्यात आलेला आहे. आता मारुती रायांचे भव्य मंदिर उभे राहिल्याने धार्मिक सांस्कृतिक भर पडली आहे.



देवगाव (ता.नेवासा) येथे श्रीराम सेवा मंडळाच्या परिश्रमातून व ग्रामस्थांच्या सहकार्यातून उभे राहिलेले मारुती मंदिर ( छाया - प्रतिक भगत)

# हिंगणा पोलिसांच्या पाठबळामुळे अवैध धंदे जोमात सरसावले !

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नागपूर :-** शहर पोलीस आयुक्तालया अंतर्गत येत असलेल्या हिंगणा पोलीसांच्या हद्दीत आमगाव (देवळी) तसेच गुमगाव या गावांमध्ये मोठ्या प्रमाणात अवैध धंद्यांचा सुळसुळाट झाला असून तरुण पिढी उध्वस्त होत असल्याचे चित्र सध्या या ठिकाणी पहायला मिळत आहे. हिंगणा ते कान्होलीबारा मार्गावर असलेल्या आमगाव (देवळी) येथे मुख्य मार्गावर असलेल्या चौकात सर्रासपणे अवैध दारू व वरली मटका सारखे धंदे जोमाने सुरू आहे.बाजुलाच शाळा आहे अशा अवैध धंद्यांचा विद्यार्थ्यांवर वाईट परिणाम होत असुन तरुण पिढी या




मुळे उध्वस्त होत आहे.

तसेच गुमगाव येथेही सट्टा पट्टी व अवैध दारूचा धंदा बिनबोभाट सुरु आहे हिंगणा पोलीसांना हे अवैध धंदे माहित नसने हे एकप्रकारचे कोडेच आहे. पोलीस स्टेशन अंतर्गत डिबी पथके ज्याला गुन्हे शाखा म्हणतात ते काय फक्त वसुली अभियान राबविण्यासाठी असतात की काय असा प्रश्न स्थानिक नागरिक करीत आहेत. या अवैध धंद्याच्या नादी लागून घरंच्या घरे उध्वस्त होत आहेत. वरिष्ठ अधिकारी सुध्दा इकडे लक्ष द्यायला तयार नाहीत.

# तरुणांमध्ये एचआयव्हीचे प्रमाण अधिक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** एचआयव्ही रुग्णांच्या संख्येत मागील पाच वर्षांत ०.२ टक्क्यांनी घट झाली आहे. रुग्णांच्या संख्येत घट झाली असली तरी नव्याने सापडणाऱ्या एचआयव्ही बाधितांमध्ये तरुणांचे प्रमाण ७५ टक्के एवढे जास्त आहे. या मध्येही एचआयव्हीबाधित महिलांचे प्रमाण ३१ टक्के इतके आहे. ही बाब चिंताजनक असली तरी नव्याने सापडणाऱ्या रुग्णांवर एआरटी केंद्रामध्ये योग्य उपचार करण्याच्या संख्येतही ४.१ टक्क्यांनी वाढ झाली आहे.

मुंबईत २०३० पर्यंत एचआयव्हीला पूर्णपणे प्रतिबंध करण्याचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी मुंबई जिल्हा एड्स नियंत्रण सोसायटीकडून सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहेत. याचाच भाग म्हणून नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्याबरोबरच अधिकाधिक तपासण्या करण्यावर भर देण्यात येत आहे. मागील पाच वर्षांमध्ये मुंबईमध्ये तब्बल २९ लाख १६ हजार ७४ नागरिकांची एचआयव्ही चाचणी करण्यात आली. त्यातून १६ हजार ७९४ बाधित रुग्ण सापडले.

मुंबईमध्ये दरवर्षी सरासरी तीन हजार नवे एचआयव्ही बाधित रुग्ण सापडत आहेत. नव्याने सापडणाऱ्या रुग्णांमध्ये १५ ते ४९ वयोगटातील रुग्णांचे प्रमाण ७५ टक्के इतके असून, यामध्ये महिलांचे प्रमाण ३१ टक्के इतके आहे. तसेच या नव्याने सापडणाऱ्या बाधितांमध्ये ९५ टक्के नागरिकांना असुरक्षित लैंगिक संबंधांमुळे एचआयव्हीची लागण होत असल्याचे तपासणीमध्ये आढळून आल्याचे मुंबई जिल्हा एड्स नियंत्रण सोसायटीचे अतिरिक्त प्रकल्प संचालक डॉ. विजय कुमार करंजकर यांनी सांगितले.

मुंबईमध्ये २०१९-२० मध्ये ६ लाख ९४ हजार ८२४ नागरिकांच्या एचआयव्ही चाचण्या करण्यात आल्या. त्यातून ४ हजार ६१७ नवे रग्ण सापडले. तर २०२३-२४ मध्ये ७ लाख २९ हजार ३०९ इतक्या नागरिकांच्या एचआयव्ही चाचण्या करण्यात आल्या. त्यातून ३ हजार ३८३ रग्ण सापडले. यावरून मागील पाच वर्षांत मुंबईतील एचआयव्ही बाधित रुग्णांच्या संख्येत ०.२ टक्क्यांनी घट झाली.

नव्याने सापडणाऱ्या रुग्णांना एआरटी केंद्रापर्यंत आणण्याच्या संख्येत मागील पाच वर्षांत ४.१ टक्क्यांनी वाढ झाली आहे. मुंबईमध्ये आतापर्यंत सापडलेल्या एकूण रुग्णांपैकी ४० हजार ६५८ एचआयव्हीबाधितांवर एआरटी केंद्रावर उपचार करण्यात येत आहेत.

# घाटकोपर फलक दुर्घटनेतील आरोपी भावेश भिंडेची दोषमुक्ततेची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** घाटकोपर येथील फलक दुर्घटनेप्रकरणी जामीन मिळाल्यानंतर इगो मीडियाचा मालक भावेश भिंडे याने आता प्रकरणातून दोषमुक्त करण्याच्या मागणीसाठी सत्र न्यायालयात अर्ज केला आहे. घटनेनंतर जनतेत निर्माण झालेला संताप कमी करण्याच्या एकमेव उद्देशाने आपल्याला या प्रकरणात गोवण्यात आल्याचा दावा भिंडे याने प्रकरणातून दोषमुक्तीची मागणी करताना केला आहे. भिंडे याने अटकेला उच्च न्यायालयात आव्हान दिले होते व अटक बेकायदा ठरवून तातडीने जामिनावर सुटका करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणीही केली होती. उच्च न्यायालयाने मात्र, त्याची अटक कायदेशीर ठरवून त्याची याचिका फेटाळली होती. त्यानंतर, भिंडे याने सत्र न्यायालयात जामिनासाठी अर्ज केला होता. सत्र न्यायालयाने ऑक्टोबर महिन्यात त्याला जामीन मंजूर केला होता. भिंडे याने आता आपण निर्दोष असल्याचा आणि आपल्याला विनाकारण या प्रकरणात गोवल्याचा दावा करून प्रकरणातून दोषमुक्त करण्याच्या मागणीसाठी सत्र न्यायालयात धाव घेतली आहे. अतिरिक्त सत्र न्यायाधीश व्ही. एम. पाथाडे यांनी भिंडे याच्या अर्जावर पोलिसांना भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश देऊन प्रकरणाची सुनावणी ७ डिसेंबर रोजी ठेवली आहे.



**पुरावा नसल्याचा भिंडेचा दावा..**

“कंपनीच्या स्थापनेपासून ते दुर्घटनाग्रस्त महाकाय फलक लावले जाईपर्यंत आपण कोणत्याही प्रकारे कंपनीशी संबंधित नव्हतो. याउलट, सध्या जामिनावर असलेल्या प्रकरणातील सहआरोपी जान्हवी मराठे या कंपनीच्या संचालकपदी कार्यरत होत्या त्यामुळे, आपल्यावरील आरोप अस्पष्ट आणि संदिग्ध असून गुन्ह्यातील आपल्या सहभागाबाबत कोणताही ठोस पुरावा नसल्याचा दावाही भिंडे याने केला आहे.”

# निळवंडे चारीचे काम सुरू झाल्याने शेतकरी समाधानी : शरद मते

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी प्रतिनिधी :**

निळवंडे धरणातील पाणी लाभ क्षेत्रातील गावांना व शेतकऱ्यांना शेतीसाठी मिळाले पाहिजे यासाठी प्राधान्य क्रमाने काम मार्गी लावू असे आश्वासन माजी महसूल मंत्री ना. राधाकृष्ण विखे व डॉ. सुजय विखे यांनी विधानसभेच्या निवडणुकीत शेतकऱ्यांना दिले होते. त्या धरतीवर गेल्या आठ दिवसापासून संगमनेर तालुक्यातील जांभुळवाडी फाटा ते कोपरगाव तालुक्यातील मल्हारवाडी राहता तालुक्यातील कोराळे डोराळे, नांदूर्खी, वाळकी या परिसरातील शेतकऱ्यांना पाणी उपलब्ध करून देण्यासाठी चारीची कामे जेसीबीच्या माध्यमातून युद्धपातळीवर सुरू झाल्याची माहिती राहता बाजार समितीचे माजी संचालक शरद मते व काकडी येथील माजी सरपंच विजय मच्छिंद्र डांगे यांनी दिली.

मते म्हणाले की, दिलेल्या शब्दाप्रमाणे विखे पिता पुत्रांनी तात्काळ कामाला सुरुवात देखील केली. त्यामुळे अद्यावत मशिनरीच्या माध्यमातून चारीची खोदकाम सुरू असून त्यात टाकण्यासाठी मोठ्या प्रमाणावर पाईपलाईन देखील काकडी मल्हारवाडी या परिसरात येऊन पडल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केंद्र आणि राज्य सरकारकडे मोठ्या प्रमाणावर प्रयत्न केलेला होता.

त्यासाठी मोठ्या प्रमाणावर निधीसाठी देखील त्यांनी पाठपुरावा केल्यामुळे निधी देखील उपलब्ध झाला व त्यामुळे आता चारीच्या माध्यमातून बंद पाईपलाईन द्वारे शेतकऱ्यांना पाणी मिळणार असल्यामुळे संगमनेर राहता कोपरगाव तालुक्यातील लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार आहे. त्यामुळे ज्या शेतकऱ्यांना निळवंडेचे पाणी मिळणार आहे. त्या शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी मोठ्या प्रमाणावर फायदा होणार असल्याने शेतकऱ्यांमधून समाधानाचे वातावरण दिसत आहे. ज्या ठिकाणी ही कामे सुरू आहे, त्या ठिकाणी व लगत मोठ्या प्रमाणावर पाईप देखील १४ किलोमीटर परीसरात येऊन पडल्यामुळे आपल्या शेतात लवकरच पाणी येईल अशी अपेक्षा आता शेतकऱ्यांमधून पुढे आली आहे. अशी माहिती शरद मते व विजय डांगे यांनी दिली.



# केंद्रीय महोत्सवचे २५ डिसेंबरपासून

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संभाजीनगर (प्रतिनिधी):** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा केंद्रीय युवा महोत्सव या सांस्कृतिक स्पर्धेचे २५ ते २८ डिसेंबर या कालावधीत विद्यापीठ परिसरात आयोजन केले आहे. कुलगुरू डॉ. विजय फुलारी यांच्या मार्गदर्शनाखाली हा महोत्सव आयोजित करण्यात येत असून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना वाव मिळावा, त्यांच्यातील कलागुणांचा, सुप्त प्रतिभांचा विकास व्हावा, उच्च शिक्षणातील तरुणांमध्ये सांस्कृतिक वृत्ती रुजावी, प्रतिभावान विद्यार्थी कलावंतांना राज्यस्तरीय, विभागीय व राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन मिळावे, सोबतच निवडक युवा कलाकारांना सांस्कृतिक कला स्पर्धेसाठी तयार करावे यासाठी केंद्रीय युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते.

संगीत, नृत्य, नाट्य, ललित कला, वाङ्मय, महाराष्ट्राची लोककला अशा सहा विभागात ही स्पर्धा संपन्न होणार आहे. ३६ कलाप्रकारांचे सहा रंगमंचावरून सादरीकरण होणार आहे. याकरिता विद्यार्थ्यांचे वय वर्षे २५ पेक्षा अधिक नसावे. या बैठकीला कुलगुरू डॉ. विजय फुलारी, सदस्य डॉ. दासू वैद्य, डॉ. सोनाली क्षीरसागर, डॉ. किशोर शिरसाठ, डॉ. वैशाली देशमुख, अभियंता आर. डी. काळे, डॉ. संजय कवडे, डॉ. भगवान साखळे, डॉ. मुस्तजीब खान यांची उपस्थिती होते.

# खा. निलेश लंके यांच्या घरासमोर पेन्शनधारकांचे धरणे व निवेदन



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिरसगाव (वार्ताहर )** नगर दक्षिणचे खासदार निलेश लंके यांचे निवासस्थानी जिल्हाध्यक्ष संपतराव समिंदर यांचे नेतृत्वाखाली धरणे आंदोलन करुन खासदार लंके यांना निवेदन देवून पेन्शनवाढीची चर्चा केली. त्यांनी सकारात्मक प्रतिसाद देवून लोकसभेच्या अधिवेशनात प्रश्न मांडणार व दिल्ली आंदोलनात सहभागी होण्याचे आश्वासन दिले. याप्रसंगी श्रीगोंदा तालुकाध्यक्ष वाळके अप्पा पारनेर तालुकाध्यक्ष यशवंत औटी, अयुबभाई शेख यांच्यासह १८/१९ जण उपस्थित होते. तसेच पूर्व सुचनेनुसार खासदार यांचे अहमदनगर येथील कार्यालयासमोर २३/२४ पेन्शन धारकांनी दोन तास धरणे आंदोलन केले.

# घोडेगाव येथे ख्रिस्त राजाची यात्रा भक्तिमय वातावरणात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** तालुक्यातील घोडेगाव येथील ख्रिस्त राजाची यात्रा भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. यात्रेची सुरुवात २० नोव्हेंबरपासून झाली होती. आध्यात्मिक तयारीसाठी तीन दिवस (त्रिदिन) ख्रिस्त राजाची नोव्हेना भक्ती करण्यात आली. २० नोव्हेंबरला नोव्हेना भक्तीचे पहिले पुष्प कॅथोलिक धर्मप्रांताचे सेवानिवृत्त बिशप रेव्ह. डॉ. लुइर्स डॅनियल यांनी गुंफले होते.

यावेळी नोव्हेना भक्ती व पवित्र संगीत मिस्सा बलिदान धार्मिक विधी झाला. आशावादी यात्रेकरू ख्रिस्तसभा याबाबत प्रबोधनात्मक मार्गदर्शन करण्यात आले. २१ नोव्हेंबरला नोव्हेना भक्तीचे दुसरे पुष्प घोडेगाव धर्मग्रामाचे सुपुत्र रेव्हरंट फादर फ्रान्सिस पटेकर, येशू संघीय, प्रिन्सिपल ज्ञानमाता विद्यालय व ज्युनियर कॉलेज, संगमनेर नोव्हेना भक्ती व पवित्र संगीत मिस्साबलिदान यांचे होते. तिसरे पुष्प औरंगाबाद डायसेसचे रेव्ह. फा. संजय ब्राम्हणे यांनी गुंफले. २३ नोव्हेंबरला यात्रेच्या दिवशी सायंकाळी ख्रिस्त राजाच्या प्रतिमेची व पवित्र साक्रामेंताची मिरवणूक सेंट ॲनिज हॉस्पिटल घोडेगाव पासून ते ख्रिस्त राजा चर्चपर्यंत काढण्यात आली होती.

नाशिक कॅथोलिक धर्मप्रांताचे मेंढपाळ बिशप रा. रेव्ह. डॉ. बार्थोल बरेटो हे यात्रेचे प्रमुख याजक व प्रवचनकार होते. पवित्र संगीत मिस्साबलिदानानंतर भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यात्रेसाठी विविध धर्मग्रामातील धर्मगुरू व धर्मभगीनी उपस्थित होते. पवित्र संगीत मिस्साबलिदानांतर ख्रिस्त राजा यात्रेची सांगता फादर अक्षय आढाव यांच्या हस्ते ख्रिस्त राजाचा ध्वज उतरवून झाली. यात्रेसाठी विविध धर्मग्रामातील धर्मगुरू, धर्मभगीनी व भाविक विविध खेड्यापाड्यातून उपस्थित होते. यात्रा यशस्वीपणे पार



पाडण्यासाठी प्रमुख धर्मगुरू रेव्ह. फादर अब्राहाम रणनवरे, रेव्ह. फादर झेवियर, सेंट ॲनिज कॉन्व्हेंट व सेंट जोसेफ कॉन्व्हेंट धर्मभगीनी, यात्रा कमिटी, धर्मग्राम पाळकीय समिती, महिला मंडळ, युथ ग्रुप, ज्येष्ठ नागरिक मंडळ व सर्व खेड्यापाड्यातील धर्मग्रामस्थ ख्रिस्त राजा चर्च, घोडेगाव यांनी परिश्रम घेतले.

## द • ख • ल

### चांगदेवनगर येथून १० हजारांचा बोकड चोरला

**पुणतांबा** : परिसरातील चांगदेवनगर – पुणतांबा रस्त्यावर भुयारी पुलाजवळ दुपारी मोटारसायकलवर आलेल्या दोन चोरट्यांनी रस्त्याच्या कडेला चरत असलेल्या शेळ्यांच्या कळपातून अंदाजे १० हजार रुपये किमतीचा बोकड चोरून नेल्यामुळे परिसरात खळबळ निर्माण झाली आहे. चांगदेवनगर येथील हिराबाई बन्सी नन्नावरे रस्त्याच्या कडेला शेळ्या चारत होत्या. मोटारसायकलवर आलेल्या चोरट्यांनी पाहणी करून क्षणार्धात बोकड उचलून पोबारा केला. डोळ्यांसमक्ष बोकड उचल्याचे दिसताच हिराबाई यांनी आरडाओरड केली. मात्र तोपर्यंत चोरटे पसार झाले. विशेष म्हणजे चोरट्यांनी पाच मिनिटातच बोकड उचलल्यामुळे चोरट्यांनी आगोदर पूर्ण माहिती घेतलेली असावी, अशी चर्चा ग्रामस्थांमध्ये सुरु झाली आहे. दिवसा ढवळ्या बोकड चोरण्याचे धाडस करत असल्याने ग्रामस्थामध्ये भीती निर्माण झाली आहे. ज्ञानेश्वर बन्सी नन्नावरे यांनी राहाता पोलीस स्टेशनला तक्रार दाखल केली आहे. व पोलीसांनी गुन्हा दाखल केला आहे. पुणतांब्यात यापूर्वी चोरीच्या अनेक घटना घडलेल्या आहेत. मात्र बहुतांशी चोऱ्यांचा तपास लागलेला नाही.

### लाडक्या बहिणींचे २१०० रुपयांच्या हप्त्याकडे लक्ष

**पुणतांबा** : विधानसभा निवडणुकीमध्ये माझी लाडकी बहीण योजना ही गेमचेंजर ठरल्याने महायुती सरकार विक्रमी मताधिक्याने पुन्हा एकदा सत्तेवर आले. पुणतांब्यातीलच नव्हे तर महाराष्ट्रातील लाडक्या बहिणींनी भरभरून मतदान केल्याने महायुतीला विजय उत्सव साजरा करता आला. परंतु लाडक्या बहिणींना पुढील हप्त्याची प्रतीक्षा असून रक्कम खात्यात कधी जमा होणार, याची चर्चा सुरू आहे. आतापर्यंत जुलैपासून नोव्हेंबरपर्यंतचे ७ हजार ५०० रुपये प्रत्येक लाभार्थी लाडक्या बहिणींच्या खात्यात जमा झालेले आहे. नोव्हेंबरमध्ये आचारसंहिता लागू होणार होती. त्यामुळे ऑक्टोबर आणि नोव्हेंबर महिन्यांचे एकत्रित पैसे दिवाळीच्या अगोदर महिलांच्या खात्यात जमा केले होते. निवडणुका संपताच लाडक्या बहिणींच्या खात्यात पैसे जमा करण्याचे आश्वासन सरकारने दिले होते. परंतु निवडणुका आटोपल्यानंतर लाडक्या बहिणींच्या खात्यात सहावा हप्ता कधी जमा होणार, याची प्रतीक्षा पुणतांबा येथील लाडक्या बहिणींना लागलेली आहे.

# ईपीएस पेन्शनधारकांचे खा.वाकचौरेंच्या घरासमोर धरणे

## दोन दिवसात कामगारमंत्र्यांशी चर्चा करणार : खा वाकचौरे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिरसगाव** : जिल्ह्यातील पेन्शनधारकांच्या सर्व प्रश्नांची मला पूर्णपणे जाणीव असून येत्या दोन दिवसात नवी दिल्ली येथे गेल्यावर केंद्रीय कामगार मंत्री मनसुख मांडवीया यांचेशी चर्चा करणार आहे. हा प्रश्न लवकर मार्गी लावण्यासाठी पाठपुरावा करू, अशी ग्वाही खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी दिली. १० व ११ डिसेंबरला रामलीला मैदान (नवी दिल्ली) येथे होणाऱ्या धरणे आंदोलनात सहभागी होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

राष्ट्रीय संघर्ष समितीच्यावतीने राष्ट्रीय अध्यक्ष कमांडर अशोकराव राऊत यांच्या आदेशानुसार इपीएस ९५ पेन्शनवाढीसाठी देशातील सर्व खासदारांट्आ घरासमोर धरणे आंदोलन करण्याचा निर्णय झाला होता.



त्याप्रमाणे शिर्डीचे खा. वाकचौरे यांच्या निवासस्थानासमोर धरणे आंदोलन करण्यात आले व त्यांना निवेदन देण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

खा. वाकचौरे म्हणाले की, हा मुद्दा पहिल्याच अधिवेशनात मांडला आहे. दिल्ली येणाऱ्या पेन्शनधारकांना आरक्षण मिळण्यासाठी त्यांना खासदार कोट्यातून रेल्वे आरक्षण देण्यासाठी पत्र देण्यात येईल म्हणजे गैरसोय होणार नाही तसेच सर्वांची राहण्याची व्यवस्थापण करता येईल. पेन्शनधारक अल्पशी पेन्शन घेऊन कसे जीवन जगत आहे त्याची जाणीव आहे. या दहा वर्षात तुम्हाला काहीच मिळाले नाही. सरकारचा आडमुठेपणा आहे. मी ४८ खासदारांना, पेन्शनर्स पदाधिकारी, पत्रकार यांना येथे बोलावणार आहे व पूर्ण शक्तीनिशी प्रश्न मांडून मार्गी लावण्याचा प्रयत्न करील. फायनान्स कमिटीची बैठक असेल त्यावेळी मी सभासद असल्याने त्यातही हा प्रश्न उपस्थित करेन.

यावेळी जिल्ह्यातून अर्जुन जाधव, बी. डी. साळवे, अशोकराव देशमुख, सुभाष आरसुले, विनायक लोळगे, बापूराव बहिरट, बी. आर. चेडे, बबनराव शेट्ये, संपतराव पाडेसे, माणिकराव अस्वले, सुलेमान शेख, श्रीरामपूर तालुकाध्यक्ष राधाकृष्ण धुमाळ, नवाज जहागीरदार, सुदेश कटारिया, डी. एस. पटारे, दत्तात्रय चौधरी, सावळेराम जाधव, मुकुंद रणभोर, अशोक भुजबळ, अशोक मगर आदी पेन्शनधारक धरणे आंदोलनात सहभागी झाले होते.

# कोट्यवधी साईभक्त घेतात भोजनाचा प्रसाद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : साईबाबा संस्थानच्या प्रसाद भोजनालयात साई दर्शन घेतल्यानंतर प्रतीदीन ६० ते ७० हजार भाविक भोजन प्रसाद घेऊन समाधानी होतात तर वर्षाकाठी दोन ते अडीच कोटी भाविक भोजन प्रसाद घेऊन जातात साईबाबा संस्थान सकाळी १० ते रात्री १० या वेळेत भोजन सुविधा देते. त्यात वरण-भात, पोळी, शिरा दोन भाज्या यांचा समावेश असतो. यासाठी किमान ५०० स्त्री पुरुष कर्मचारी सेवा देतात त्याबरोबरच भक्ती निवास, द्वारावती, साई आश्रम, साईनाथ व साईबाबा सुपर हॉस्पिटल या ठिकाणीदेखील साईभक्त भाविकांना व रुग्णालयातील रुग्णांना मोफत भोजन दिले जाते त्याबरोबरच सेवाभावी शिर्डी येथील मूकबधिर शाळा, अनाथ आश्रम कनकुरी व निमगाव येथील शालेय मुलांन या भोजन प्रसादाचा लाभ मिळत असतो. साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर व त्रिस्तरीय समितीच्या मार्गदर्शनाखाली चांगल्या सुविधा साईभक्त भाविकांना देण्यासाठी अविरतपणे प्रयत्न केला जात असल्याने मोठ्या प्रमाणावर साईभक्त भाविक शिर्डी येथे येत असतात.



### लाडक्या बहिणींसह दाजींनाही पैशाची ओढ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : विधानसभेच्या निवडणुकीत लाडक्या बहिणींनी कमाल केली आणि मतदानाचा टक्कादेखील वाढला. त्यामुळे महायुतीला मोठा विजय मिळवून हे सरकार सत्तेत आले. हे जरी खरे असले तरी निवडणुकीच्या काळात महायुतीने सत्तेमध्ये आलो तर पंधराशे रुपयात वाढ करून २१०० रुपये दिले जातील असे आश्वासन दिले होते. त्यामुळे या बहिणी व दाजींनीदेखील भरभरून मतदान केले. परंतु आता खात्यात कधी पैसे जमा होणार याची प्रतीक्षा अहिल्यानगर जिल्ह्यातील अकरा लाख पन्नास हजार पात्र ठरलेल्या लाडक्या बहिणींना लागली आहे.

आतापर्यंत पाच हप्ते जमा झालेले आहेत तर काही महिलांना तांत्रिक अडचणीमुळे पैसे मिळाले नसले तरी ज्यांनी तांत्रिक अडचणीची पूर्तता केली त्यांना पैसे मिळाले आहे. नोव्हेंबरमध्ये आचारसंहिता लागू होणार असल्याने तात्कालीन सरकारने ऑक्टोबर-नोव्हेंबरचे पैसे दिवाळीमध्ये जमा केले होते. काहींना तर एकाच वेळी साडेसात हजार रुपये मिळाले होते. आता निवडणुका झाल्या आहेत. सरकार पंधराशे रुपये पाठवणार की दिलेल्या शब्दाप्रमाणे २१०० रुपये टाकणार याकडे या बहिणींचे लक्ष लागले आहे आता या बहिणींना आपला सहावा हप्ता कधी जमा होणार याचीच प्रतीक्षा लागलेली आहे. तशीच चर्चा महिलावर्गात सुरू आहे एकीकडे मुख्यमंत्री म्हणून कोणाला संधी मिळते उपमुख्यमंत्री म्हणून कोणाची वर्णी लागते, मंत्रिमंडळाचा शपथविधी कधी होतो, यात कोणाला कोणते मंत्रिपदे मिळतात याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागलेले असताना महाराष्ट्रातील लाडक्या बहिणींना मात्र आपल्या खात्यात पंधराशे रुपये पडतात की दिलेल्या आश्वासन प्रमाणे २१०० रुपये पडतात याकडेच लक्ष लागले आहे.

# प्रवरेच्या कृषीकन्यांचे नांदूर येथे आगमन



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लोणी** : राहाता तालुक्यातील नांदुर बुद्रुक येथे कृषी महाविद्यालय लोणी येथील कृषीकन्यांचे आगमन झाले आहे. शेतकऱ्यांनी या कृषीकन्यांचे स्वागत केले. महात्मा फुले कृषी विद्यापीठ संलग्नित कृषी महाविद्यालय, लोणी येथे हे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ सुष्मिता विखे, कृषी शिक्षण संचालक डॉ. उत्तमराव कदम व कृषी महाविद्यालय लोणीचे प्राचार्य डॉ. दिलीप महाले यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम समन्वयक डॉ. रमेश जाधव, कार्यक्रम अधिकारी डॉ. विक्रम अनाप आणि प्रा. अक्षया वाळुंज हे कृषीकन्या दिशा काकडे, सृष्टी राऊत, पुजा राजवाळ, शुभांगी तेलगोटे यांना नेहमी सूचना देऊन नांदुर बुद्रुक येथील शेतकऱ्यांचे अनुभव जाणून घेत त्यांना मार्गदर्शन करणार आहेत. याप्रसंगी सरपंच विशाल गोरे, उपसरपंच सुदर्शन पारखे, ग्रामविकास अधिकारी रविंद्र बोरसे, मधुकर घोरपडे, ग्रामस्थ सागर भदे, राजेंद्र गलांडे उपस्थित होते. कृषी शिक्षणाच्या माध्यमातून कृषीकन्या येथील शेतकऱ्यांना सेंद्रिय शेती, बीजप्रक्रिया , गांडूळखत उत्पादन, चारा पिके, दुग्ध व्यवसाय, बायोगॅस आदी संदर्भात माहिती देणार आहे.

# आनंदगडावर आधुनिक तंत्रज्ञान विकसित करणार : रिको सॅक्यानु

### जपानी तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण केंद्र वीरगावमध्ये

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गणोरे** : ग्रामीण भागात आदिवासी घटकांसाठी काम करणाऱ्या आनंदगड शैक्षणिक संकुलात माहिती तंत्रज्ञानासाठी आधुनिक तंत्रज्ञान विकसित करून जपानी तंत्रज्ञानाने शुद्ध पाणी उपलब्धतेसाठीचे प्रशिक्षण केंद्र वीरगाव येथे सुरू करण्यात येईल, अशी ग्वाही जपान येथील व्यावसायिक एंजेल बँकेच्या मुख्याधिकारी रिको सॅक्यानु यांनी दिली.

वीरगाव (ता अकोले) येथील आनंदगडावर आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष रावसाहेब वाकचौरे होते. प्रा. डॉ. मुग्धा महाले, सचिव डॉ. अनिल रहाणे, संचालिका सुप्रिया वाकचौरे, गीता रहाणे, प्रा. डॉ. प्रतिक्षा रहाणे, अक्षय रहाणे, प्राचार्य किरण चौधरी, प्रा संदीप थोरात, दिनेश वाकचौरे, पिंगला तोरमल आदी उपस्थित होते.



जपान सरकार व एंजेल ग्रुपच्या माध्यमातून हवेतून शुद्ध पाणो मिळविण्याचे तंत्रज्ञांन विकसित करण्यात येणार असून महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने त्याची सुरुवात वीरगावपासून होईल तसेच या तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण केंद्रदेखील येथे सुरू केले जाईल, असे रिको यांनी सांगितले. आनंदगडावरील विद्यार्थ्यांना जगातील इतर विद्यार्थ्यांशी स्पर्धा करण्यासाठी विविध सॉफ्टवेअर व तंत्रज्ञान उपलब्ध करुन देण्याचे अभिवचनही त्यानी यावेळी दिले. या शैक्षणिक संकुलाच्या विकासासाठी आवश्यक भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्याचेही सुतोवाच त्यांनी केले.

केमिकल, खते व इतर घटकांमुळे प्रदूषित पाण्यापासून मुक्ती म्हणून शुद्ध व स्वच्छ पाण्याचा स्रोत म्हणून हवेतून पाणी जमा करण्याचे तंत्रज्ञान त्यानी विकसित केले असून लवकरच ते कार्यान्वित होणार असल्याचे रिको यांनी सांगितले. डॉ मुग्धा महाले यांनी तंत्रज्ञानाचा योग्य वापर केल्यास जीवन कसे सुकर होते व त्याच्या अतिरेकाचे दुष्परिणाम कसे होतात हे आपल्या भाषणातून विषद केले. मोबाईल हे दुधारी शस्त्र असून विद्यार्थ्यांनी त्याचा योग्य वापर केला तर सर्वांगीण विकास साध्य होतो. पण गैरवापर व अतिरेक केल्यास त्याचे होणारे ही दुष्परिणाम सांगितले.

सचिव अनिल रहाणे यांनी स्वागत केले. उज्ज्वला धुमाळ यांनी प्रास्तविक ,संस्था परिचय व अतिथी परिचय करवून दिला. सूत्रसंचलन श्रद्धा वाळुंज व गव्हाळे यांनी तर आभार डॉ प्रतिक्षा रहाणे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा संदिप थोरात, रविंद्र आंबरे, देवीदास चारुडे, विवेक शेटे, पोपट दिघे, आकाश वर्पे, रामदास अस्वले, गोरक्ष पवार, दत्ता जगताप, चिकने, वर्पे, नफिसा शेख, अंजिरा देशमुख, अलका आहेर, उषा गुंजाळ, शिल्पा देशमुख, सीमा दिघे, सोनाली आहेर, कविता दातीर, माया आंबरे, अश्विनी गिरी, स्वप्नाली बाळसराफ आदींनी सहकार्य केले.

# आदमाने-औताडे वस्ती रस्त्याच्या डांबरीकरणास सुरुवात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**चितळी** : आ.आशुतोष काळे यांच्या विशेष प्रयत्नातून राज्याचे महसूलमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या मार्गदर्शनाखाली जळगावचे लोकनियुक्त सरपंच शिवाजी साबदे यांच्या पाठपुराव्यातून वसंतराव नाईक समाज कल्याण योजनेंतर्गत रस्ताचे डांबरीकरण करण्यासाठी ८ लाख रुपये निधी मंजूर झाला. त्यामुळे जळगाव (ता. राहाता) येथील आदमाने वस्ती-औताडे वस्तीच्या परिसरातील जळवळपास ३४४ मीटर रस्त्याच्या खडीकरण व डांबरीकरणाचे काम सुरू करण्यात आले आहे.



**चितळी** : जळगाव (ता.राहाता) येथील औताडे-आदमाने वस्ती रस्त्याचे डांबरीकरण व मजबुतीकरणाचा श्रीफळ वाढवून शुभारंभ करताना मान्यवर. (छाया : प्रवीण दरंदले)

बुधवारी (ता.२७) सरपंच साबदे, उपसरपंच दिलीप चौधरी यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून रस्त्यांच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला. साबदे म्हणाले की, आदमाने वस्ती व औताडे वस्ती येथील रस्त्याची खूप वर्षापासून अत्यंत दयनीय अवस्था होती. हा प्रश्न सोडविणे गरजेचे होते. सदर रस्त्यांचे मजबुतीकरण करावे, अशी स्थानिकांची मूलभूत मागणी होती. स्थानिक नागरिकांना पूर्वीपासूनच खराब रस्त्याचा वापर करावा लागत होता.

दूध उत्पादक, शेतकरी, विद्यार्थी यांना पावसाळ्यात चिखलमय रस्ता तुडवत जावे लागते होते. स्थानिक नागरिक खराब रस्त्यामुळे विविध समस्यांचा सामना करत होते. आता सदरील रस्त्याचे काम पूर्णत्वास येणार आहे. रस्त्याचे काम मार्गी लावण्यात आम्हाला यश आले असल्याचे साबदे म्हणाले. सोयायटी अध्यक्ष सुरेश औताडे, राहाता कृषी उत्पन्न बाजार समितीचे मा. संचालक यशवंत चौधरी, मच्छिंद्र चौधरी, ग्रा.सदस्य विजय चौधरी, दयानंद गायकवाड, शिवाजी चौधरी, संतोष कापसे, महेश औताडे, विष्णू औताडे, सुखदेव आदमाने, ज्ञानदेव आदमाने, दिलीप चौधरी, बाळासाहेब शेलार, राधु रकटे आदी उपस्थित होते.

### मंत्रिपदाची जबाबदारी दिल्यास अनुभवातून पदाला न्याय देऊ : आ. लंघे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**नेवासा** : महायुतीने मंत्रिपदाची जबाबदारी दिल्यास गेल्या २५ वर्षाच्या प्रशासकीय अनुभवातून या पदाला न्याय देण्याचे काम करू, असे प्रतिपादन नेवासा विधानसभा मतदार संघाचे नवनिर्वाचित आमदार विठ्ठलराव लंघे यांनी केले.नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत आ. लंघे यांनी माजी मंत्री शंकरराव गडाख तसेच माजी आमदार बाळासाहेब मुरकुटे यांच्याबरोबर झालेल्या तिरंगी लढतीत ४०२१ मतांनी विजय संपादन केला. निवडणूक पार पडल्यानंतर मंत्रीपदासाठी आ. लंघे यांच्या नावाची चर्चा आहे. त्या धर्तीवर एका मुलाखतीमध्ये मंत्रीपदाच्या विषयावर भाष्य करताना ते म्हणाले की, एक माजी मंत्री व तीन माजी आमदार या तालुक्यात विरोधात होते. मात्र माझ्या जीवलग मतदारांनी तसेच लाडक्या बहिणींनी मला विजय मिळवून दिला. त्यांचे उपकार विसरणे शक्य नाही. नेवासा तालुक्याला विकास करून न्याय देण्याचं काम करु. मला २५ वर्षे जिल्हा परिषद सदस्य तसेच अडीच वर्ष जिल्हा परिषद अध्यक्षपद मिळाले आहे. त्यामुळे मला प्रशासकीय कामाचा अनुभव चांगला आहे. जर वरिष्ठांकडून मला मंत्रीपदाची संधी मिळाली तर निश्चीतच माझ्या पंचवीस वर्षाच्या अनुभवातून त्या पदाला तालुका जिल्ह्यासह राज्याला न्याय देण्याचं काम करु.तालुक्यातील मतदार तसेच लाडकी बहीण, साधूसंतच माझ्या विजयाचे शिल्पकार असल्याचे ते सांगायला विसरले नाहीत. डोळ्यासमोर नेवाशाच्या विकासाचं व्हिजन घेऊन काम करणार असून विरोधकांची दहशत मोडून काढणार असल्याचे ते म्हणाले.

# वनविभागाच्या भूमिकेमुळे लाभार्थी घरकुलांपासून वंचित

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**म्हैसगाव** : येथे प्रधानमंत्री घरकुल योजनेंतर्गत ५५ घरकुले मंजूर झाली आहेत. त्याचे बांधकामही सुरू करण्यात आले आहे. परंतु काही घरकुल वनविभागामध्ये असल्यामुळे घरकुलाचे काम बंद करण्यात यावे, असे वनविभागच्या वरिष्ठ वन अधिकाऱ्यांनी फोन करून सांगितल्याने ग्रामसेविका अधिकारी पठाण यांनी काम बंद करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

म्हैसगावमध्ये मोठ्या प्रमाणात आदिवासी, मागासवर्गीय हे वनविभागाच्या जागेत खूप दिवसांपासुन राहत आहेत. काही आदिवासींना ही वनजमीन वर्ग करण्यात आली आहे.त्या ठिकाणी जुनी घरेही आहेत. अनेकांना नवीन घरकुल मंजूर झाल असून पैसे बँकेमध्ये वर्ग झाले आहे. त्यांनी ते पैसे काढून घरकुलाचे बांधकाम सुरू करणार होते. पण वनविभाच्या जागेत घरकुल बांधु देऊ नका, अशी भूमिका वनविभागाने घेतली आहे. वनमजूर सुनील अमोलिक हे म्हैसगावमध्ये वनरक्षक म्हणून काम करतात. त्यांना वन अधिकारी यांचा फोन आला होता. त्यांनी



ग्रामसेविका अधिकारी यांच्याशी बोलण्यास सांगितले. ग्रामसेविका यांच्याबरोबर बोलणे झाले. त्यांना वरिष्ठ वनाधिकाऱ्यांनी नवीन घरकूल बांधण्यास मनाई करा, असा सांगिते. त्यामुळे सध्या घरकुलाचे काम थांबवण्यात आले आहे. वनविभागाच्या या भूमिकेमुळे अनेक ग्रामस्थ घरकुलापासून वंचित झाले आहेत. घरकूल मंजूर झालेले असूनही त्यांना ते बांधावे कोठे, असा प्रश्न पडला आहे. ग्रामसेविका एस. यु. पठाण म्हणाल्या, वन विभाघाच्या वरिष्ठ अधिकारी यांनी फोनवरून म्हैसगाव मधील वनजमिनीवरील घरकुल बंद करायला सांगितले आहे. त्यावरून घरकूल बांधकाम बंद करण्यास सुरुवात केली आहे.

# दूधउत्पादकांना न्याय मिळेपर्यंत लढा सुरुच : ॲड. काळे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिरसगाव** : दूधउत्पादक शेतकऱ्यांना न्याय मिळेपर्यंत लढा सुरु राहणार असल्याचे प्रतिपादन शेतकरी संघटनेचे उपाध्यक्ष ॲड. अजित काळे यांनी केले. शेतकरी संघटना, दूध उत्पादक शेतकऱ्यांचावतीने अडचणीत आलेला दूध व्यवसाय वाचवण्यासाठी व यापूर्वी आंदोलनाद्वारे केलेल्या मागण्यांची पूर्तता न झाल्याने तसेच ठोस असा कायदा अजूनही अस्तित्वात आला नसल्याने बैठक झाली. त्यावेळी काळे बोलत होते.

बैठकीसाठी जिल्हाभरातून दूध उत्पादक शेतकरी उपस्थित होते. शेतकऱ्यांच्या अडचणी, पडलेले भाव, प्रलंबित अनुदान, बँकाचे घेतलेले कर्ज, वाढलेले पशुखाद्याचे दर, दूध भेसळ रोखण्यात सरकारला आलेलं अपयश व यामुळे शेतकऱ्यांचं होत असलेलं



नुकसान यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीसाठी संगमनेर, अकोला, राहाता, राहुरी, नेवासा कोपरगाव तालुक्यातील शेतकऱ्यांनी आपली व्यथा मांडली.

ॲड. काळे म्हणाले की, लुटीची व्यवस्था बदलायची असेल तर एकत्रीतपणे संघटीत होऊन या संबंधीचा कायदा लवकरात लवकर विधानसभेत मांडला जाण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. नव्याने निवडून आलेल्या सर्व आमदारांना दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या मागण्यांचे सविस्तर निवेदन देण्यात येणार आहे व त्यांना १५ दिवसांचा अवधी यासाठी दिला जाणार आहे.

त्यानंतरही काहीही निर्णय झाला नाही तर आम्ही महाराष्ट्रामध्ये रस्त्यावर उतरून हे आदोलन कानाकोपऱ्यात पोहचवू. शेतकऱ्यांना न्याय मिळत नाही तोपर्यंत आम्ही शांत राहणार नाही. यासाठी आम्हाला कुठलीही किंमत चुकवावी लागली तरी हरकत नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

बैठकीसाठी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अनिल औताडे, तालुका अध्यक्ष युवराज जगताप, युवा आघाडीचे तालुकाध्यक्ष शरद आसने, उपाध्यक्ष संदीप उघडे, डॉ दादासाहेब आदिक, रपेंद्र काले, साहेबराव चोरमळ, रामनाथ वदक, रवी हासे, माणिक पांडे, बाळासाहेब घोडे, प्रकाश ताके, समीर रोकडे, मयुर नाईक, प्रमोद ताके, बाबासाहेब पवार, आप्पासाहेब ताके, अनिल रोकडे, अनिल जीवरख, विशाल शेळके, बाबासाहेब शेळके, अरुण खर्डे, अनिल रोकडे, सचिन वेताळ, सतीश नाईक, मयुर नाईक, सुजीत बोडखे, सागर मुठे, प्रणव भारत, सुनील पटारे, संतोष मासाळ, गोरख वेताळ, ओम नाईक, नितीन बोरुडे यांच्यासह दूध उत्पादक शेतकरी उपस्थित होते. सागर गिऱ्हे यांनी आभार मानले.

(पान १ वरुन)

## प्रत्येक जोडप्याला ...!

की लोकसंख्या वाढीचे दर २.१ पेक्षा खाली गेले, तर तो समाज नष्ट होतो, तो समाज जगाच्या पाठीवर नसतो, त्याला कोणी नष्ट करत नाही, तर तो स्वतःहून नष्ट होतो. अनेक भाषा आणि समाज असेच नष्ट झाले आहे, असे मोहन भागवत म्हणाले.

आपल्या देशाची लोकसंख्या नीती वर्ष २००० च्या जवळपास ठरली. त्याच्यातही असेच सांगितले आहे की लोकसंख्या वाढीचा दर २.१ पेक्षा खाली राहू नये, असा उल्लेख करत भागवत म्हणाले की आता पॉईंट एक तर माणूस जमत नाही. मग जर २.१ एवढे लोकसंख्या वाढीचे दर पाहिजे, तर अपत्य दोन पेक्षा जास्त पाहिजे. मग तीन पाहिजे कमीत कमी असंही भागवत म्हणाले.

जैन, पारशींचीही लोकसंख्या घटली

अहवालानुसार, भारतात बौद्ध धर्मियांच्या संख्येत वाढ झाली आहे. दरम्यान, १९५० ते २०१५ या काळात मुस्लिमांची लोकसंख्या ४३.१५ टक्क्यांनी वाढ झाली, तर ख्रिश्चनांच्या लोकसंख्येत ५.३८ टक्क्यांनी वाढ झाल्याचा अहवाल आहे. शिवाय शीख धर्मियांच्या संख्येतही ६.५८ टक्क्यांनी वाढ झाली आहे.

## हिवाळी अधिवेशन होणार ...!

दुसरीकडे राज्याच्या हिवाळी अधिवेशनाच्याही तयारीची लगबग सुरु झाली आहे.मुंबईप्रमाणे आता नागपूरमध्येही संपूर्ण पेपरलेस अन् डिजीटल कामकाज सुरु होणार आहे.

नागपूर येथे विधी मंडळाच्या दोन्ही सभागृहात मुंबई येथील विधान भवनातील दोन्ही सभागृहाच्या कामकाज प्रमाणे पेपरलेस व्यवस्था करण्यात येत आहे. प्रत्येक टेबलवर अत्याधुनिक स्क्रीन आणि कंट्रोल व्यवस्था करण्यात येत आहे. त्यामुळे दररोज कामकाजाचे कागद, सारे अहवाल स्क्रीनवर उपलब्ध असतील. विधानसभा आणि विधान परिषदेच्या कामकाजाची तयारी सध्या पूर्ण झाली आहे.

## ५३ कोटी द्या, ६३ जागांचे ..

वापर करून तो ईव्हीएम हॅक करू शकतो, असा दावा त्यांनी केला होता. त्यासाठी तो पैसे घेईल. शुजा सांगतात की तो अमेरिकेच्या संरक्षण खात्यात कंत्राटावर काम करतो.

सय्यद शुजा यांनी २१ जानेवारी २०१९ रोजी लंडनमध्ये इंडियन जर्नालिस्ट असोसिएशनच्या पत्रकार परिषदेतही असाच दावा केला होता. शुजाने सांगितले होते की, त्यांनी २००९ ते २०१४ पर्यंत इलेक्ट्रॉनिक्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड मध्ये काम केले आहे. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत ईव्हीएम बनवणाऱ्या टीमचा तो एक भाग होता. तेव्हा विशिष्ट फ्रिक्वेन्सी वापरून या मशीन्समध्ये छेडछाड केली जाऊ शकते, असे त्यांनी सांगितले होते.

२०१४ च्या लोकसभा निवडणुकीत ईव्हीएम हॅक झाल्याचा दावाही शुजा यांनी केला होता आणि त्या आधारावर भाजपने विजय मिळवला होता, असे त्याने म्हटले होते. काँग्रेसचे माजी नेते कपिल सिब्बल यांनी या दाव्यांचा मुद्दा बनवून ईव्हीएमच्या विश्वासार्हतेवर प्रश्न उपस्थित केले होते.

## दोन मराठा उपमुख्यमंत्री असताना ...

''राष्ट्रीय मुस्लिम मंचा''शी संबंधित एका आरएसएसच्या नेत्यानं म्हटलं की, ''फडणवीस यांची निर्णायक भूमिका पाहता त्यांना मुख्यमंत्री म्हणून निवडलं पाहिजे असा स्पष्ट संदेश आरएसएसने भाजप नेतृत्वाला दिला आहे. असं केलं नाही तर पक्षाला आगामी निवडणुकीत विशेषतः बीएमसी निवडणुकीत मोठा फटका बसेल.''आरएसएसने ज्या चार नेत्यांना तयार केलं ते संघाच्या मार्गदर्शनाचं पालन करत नसल्यानंही आरएसएस नाराज आहे. संघाचं म्हणणं आहे की, अजित पवार, एकनाथ शिंदे हे दोन्ही मराठा समाजातील आहेत. अशा स्थितीत भाजपच्या काही नेत्यांकडून मराठा मुख्यमंत्र्यावर जोर देण्याचं काही ठोस कारण नाहीये.आरएसएसच्या एका वरिष्ठ कार्यकर्त्याने सांगितलं की, ''हा मुद्दा पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांसमोर उपस्थित केला गेला तेव्हा मुरलीधर मोहोळ यांना स्पष्ट करावं लागलं की मुख्यमंत्रिपदासाठी त्यांचं नाव चर्चेत आलंय ही फक्त अफवा आहे.'' मोहोळ यांनी सोशल मीडियावर पोस्ट करून ''पक्षाची शिस्त आणि निर्णय हा अंतिम आहे'' असं सांगत सोशल मीडियावरील चर्चा अफवा असल्याचं स्पष्ट केलं होतं.

# लहुजी सेनेच्या महिला आघाडीकडून आ. लंघे यांचा सन्मान



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** लहुजी सेनेच्या पश्चिम महाराष्ट्र महिला आघाडीच्यावतीने आमदार विठ्ठलराव लंघे यांचा विजयश्री प्राप्त केल्याबद्दल सन्मान करण्यात आला. स्त्री शक्तीच्या उध्दारासह सर्वसामान्य नागरिक व वंचित घटकांना आ. लंघे हे न्याय देतील. त्यासाठी त्यांना मंत्रिमंडळात स्थान द्या, अशी मागणी महिला आघाडीच्या पश्चिम महाराष्ट्र अध्यक्षा मंगल चव्हाण यांनी यावेळी केली.

चव्हाण म्हणाल्या की, लहुजी सेनेने नेहमीच सर्वसामान्य माणसांच्या न्याय हक्कांसाठी लढा दिला आहे आणि आजपर्यंत देत आहे. मोर्चे, उपोषण, रास्तारोकोसारखे आंदोलन समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी करत असतो. आज आम्हाला सर्वसामान्य, गरीब-दिनदुबळ्यांमध्ये रहाणारा आमदार मिळाला आहे. जिल्हा परिषदेच्या माध्यमातून उल्लेखनीय कामगिरी त्यांनी केली आहे. त्यांच्या या अनुभवाचे सर्व बाळकडू त्यांना समाजसेवेसाठी झटणारे त्यांचे वडील आमदार वकील अण्णा लंघे यांच्याकडूनच मिळाले असल्याने वंचित घटकांना न्याय देण्यासाठी आमदार लंघे यांना मंत्रिमंडळात स्थान मिळावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.यावेळी महिला आघाडीच्या सदस्या लता भोसले, गणिता भोसले, दीपाली भोसले उपस्थित होते.

# छोट्याच्या गावातल्या डॉ. गणेश पटारे यांची प्राचार्यपदाला गवसणी

### भूमिपुत्राने धामोरी गावची मान उंचावली



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** तालुक्यातील धामोरी गावचे सुपुत्र प्राध्यापक डॉ. गणेश रावसाहेब पटारे यांची नुकतीच पुण्यातील डेक्कन येथील नामांकित महाराष्ट्र शासन अनुदानित मराठवाडा मित्र मंडळाच्या वाणिज्य महाविद्यालयात प्राचार्य म्हणून नियुक्ती झाली आहे.

अतिशय खडतर प्रवासातून डॉ. गणेश पटारे यांनी त्यांचे उच्च शिक्षण पूर्ण केले. धामोरीसारख्या छोट्याशा गावात जेथे आवश्यक तेवढया पायाभूत सुविधांची उपलब्धता नसताना त्यांनी सर्व अडचणीवर जिद्दीने मात करत उच्च शिक्षण पूर्ण केले. नेवासा येथील श्री ज्ञानेश्वर महाविद्यालयामधून बी.कॉम. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी पुण्याच्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात एम.कॉम, एम.फीलनंतर पीएचडीपर्यंत शिक्षण पूर्ण केले आहे. प्राध्यापक पदासाठी आवश्यक राष्ट्रीय शैक्षणिक पात्रता परीक्षा तसेच राज्य शैक्षणिक पात्रता परीक्षादेखील त्यांनी पूर्ण केल्या आहेत.

मागील बारा वर्षापासून डॉ.पटारे पुण्याच्या गरवारे महाविद्यालयात अध्यापनाचे काम करत होते. त्यांच्या शैक्षणिक आणि संशोधन प्रवृत्तीमुळे त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात विशेष योगदान दिले आहे. त्यांचे आतापर्यंत साठ शोधनिबंध विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संशोधन पत्रिकेमध्ये प्रसिद्ध झाले आहेत. त्याचबरोबर २५ हून अधिक पुस्तकांचे लिखाण डॉ. पटारे यांनी केले आहे, संशोधनामध्ये विशेष प्राविण्य मिळवून त्यांना सर्वात कमी वयाचा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा मान्यता प्राप्त पीएचडी संशोधक म्हणून बहुमान प्राप्त झाला आहे. सध्या त्यांच्या मार्गदर्शनाखाली सहा विद्यार्थी पीएचडीचे संशोधन करत आहेत. महाराष्ट्र शासनाच्या कृषी व पणन विभागाचेमार्फत चालवल्या जाणाऱ्या स्मार्ट प्रोजेक्टचे ते प्रशिक्षक म्हणून काम बघत आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वाणिज्य आणि व्यवस्थापनाच्या अभ्यास मंडळावरदेखील त्यांची नियुक्ती झालेली आहे, त्याचबरोबर कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगावच्या अभ्यास मंडळावर त्यांची यापूर्वीच नियुक्ती झालेली आहे.

पुणे, नगर, नाशिक या तीन जिल्ह्यातील प्राध्यापकांच्या आर्थिक साक्षरता या विषयावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने तसेच रिझर्व बँकेच्या केंद्रीय मंडळाचे संचालक सतीश मराठे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रकल्प पूर्ण करून तो शासनास सादर केला आहे. सामाजिक कार्यकर्ते आदिनाथ पटारे यांचे ते बंधू असून डॉ. पटारे यांच्या या निवडीबद्दल अनेकांनी त्यों अभिनंदन केले आहे.

# पाटणी विद्यालयाच्या स्वामिनीचा 'सुवर्ण' वेध

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** क्रीडा व युवक संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या विद्यमानाने त्रिमूर्तीनगर येथील या घाडगे पाटील विद्यालयात झालेल्या शालेय विभागीय शूटिंग स्पर्धेत हिंद सेवा मंडळाच्या येथील पाटणी विद्यालयाची स्वामिनी जेजूरकरने एअर पिस्तोल दहा मीटर या प्रकारात १४ वर्षाखालील गटात सुवर्ण वेध साधत सुवर्णपदकाची कमाई केली. पाच डिसेंबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय शालेय स्पर्धेसाठी तिची निवड झाली आहे, अशी माहिती मुख्याध्यापक विठ्ठल भांगरे यांनी दिली.

तिच्या यशाबद्दल तिचे हिंद सेवा मंडळाचे उपाध्यक्ष रवींद्र गुलाटी, मानद सचिव संजय जोशी, विद्यालयाचे अध्यक्ष भरत कुंकूलोळ, मुख्याध्यापक भांगरे, पर्यावेक्षिका रश्मी कासार व हिंदसेवामंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या पतपेढीचे संचालक महेश डावरे यांनी अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या. स्वामिनीला अहमदनगर शूटिंग क्लबचे प्रशिक्षक ऋषिकेश दरंदले, विद्यालयाचे क्रीडा शिक्षक बाबासाहेब औटी व उर्मिला पुजारी यांचे मार्गदर्शन लाभले.



************

# दांडिया स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ उत्साहात



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव :** सुधन गोल्ड लोन प्रस्तुत लायन्स, लिओ व लिनेस क्लब ऑफ कोपरगाव आणि सखी सर्कल वुमेन्स ग्रुप आयोजित लिओ दांडिया रास स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ स्व.यशवंतराव चव्हाण समता सहकार सभागृहात उत्साहात झाला. नवरात्र उत्सवानिमित्त आमदार आशुतोष काळे, चैताली काळे, महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे, माजी नगराध्यक्षा सुहासिनी कोयटे. गोदावरी दूध संघाचे अध्यश्र राजेश आबा परजणे यांच्या उपस्थितत या स्पर्धा झाल्या होत्या.

तुलसीदास खुबानी ज्वेलर्सकडून कृपास्पर्श ग्रुपला उत्कृष्ट गरबा नृत्याबद्दल रोख ११ हजार रुपयांचे बक्षीस व सन्मान चिन्ह देण्यात आले. आकांक्षा शर्मा व दिव्या शर्मा, प्रेरणा जैन व मयुरी जैन, क्रिया पोरवाल व भाविका धाडीवाल या उत्कृष्ट गरबा नृत्य करणाऱ्या कपलला विसपुते सराफ यांच्याकडून प्रत्येकी ३ हजार रुपयांचे रोख बक्षीस व सन्मान चिन्ह तर वैशाली ऑटोमोबाईल्स कडून कशिश शर्मा, प्रियंका आर्या, मधु उपाध्याय यांनी उत्कृष्ट गरबा नृत्य केल्याबद्दल प्रत्येकी २ हजार १०० रुपये रोख व सन्मानचिन्ह देण्यात आले.

रितिक परदेशी, कृष्णा चव्हाण, विवेक पटेल या तीन स्पर्धकांना उत्कृष्ट गरबा नृत्याबद्दल साई ज्योती पिल्स हॉस्पिटलकडून प्रत्येकी २ हजार १०० रुपये रोख व सन्मानचिन्ह बक्षीस रूपात देण्यात आले. लहान मुलांमध्ये उत्कृष्ट गरबा नृत्य करणाऱ्या वद्य पटेल, नायिया साजिद, तनिष आढाव व अन्वी यादव या स्पर्धकांना प्रत्येकी ५०० रुपये रोख बक्षीस व सन्मान चिन्ह तसेच उत्कृष्ट वेशभूषा लहान स्पर्धकांमध्ये नक्षत्रा परदेशी, कृष्णाव पटेल, वद्य पटेल, धार्मिक पटेल या स्पर्धकांना प्रत्येकी ५०० रुपये रोख व सन्मानचिन्ह दिले गेले.

सन्मती फायनान्शिअल ग्रुपकडून आदिशक्ती ग्रुपला उत्कृष्ट वेशभूषा केल्याबद्दल रोख ८ हजार रुपये व स्मृतिचिन्ह तर भारत एफ.आर.पी.कडून कृष्णा व राधा, दिव्या शर्मा व आकांक्षा शर्मा, प्रेरणा जैन व मयुरी जैन या तीन उत्कृष्ट वेशभूषा करणाऱ्या कपलला प्रत्येकी ३ हजार रुपये रोख व सन्मानचिन्ह दिले गेले. गुरु डिजिटलकडून कशिश शर्मा, तेजस्विनी यादव, आशु परदेशी या तीन महिला स्पर्धकांनी उत्कृष्ट वेशभूषा केल्याबद्दल प्रत्येकी २ हजार १०० रुपये रोख व सन्मानचिन्ह बक्षीस रूपात देण्यात आले.

विमल फर्निचरकडून आयुष ठोळे, विशाल वाडेकर, भाविक रावल या तीन पुरुष स्पर्धकांनी उत्कृष्ट वेशभूषा केल्याबद्दल प्रत्येकी २ हजार १०० रुपये रोख बक्षीस व सन्मानचिन्ह देण्यात आले. जेडी बिल्डर्स अँड इंटेरियरकडून उत्कृष्ट थ्री पीसबद्दल आंचल डागा व हर्षद बनसोडे आणि उत्कृष्ट गरबा रिल्समध्ये डॉ. दिपाली आचार्या यांना प्रत्येकी २ हजार १०० रुपयांचे रोख बक्षीस व सन्मान चिन्ह देण्यात आले.

यावेळी सुधन गोल्ड लोनचे अध्यक्ष संदीप कोयटे, राजेश ठोळे, तुलसीदास खुबानी आणि दीपक विसपुते आदींसह प्रायोजकत्व मिळालेल्या संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी धीरज कराचीवाला, मानस नागरे, करण शहा, आदित्य गुजराती, पृथ्वी शिंदे, हर्षल होडे, शुभम भडकवाडे, सुमित सिनगर, हर्षल कृष्णानी, कुशल कोठारी, उत्कर्ष काले, प्रणव गुजराती, सम्यक गंगवाल, कुशल काले, रौनक काले, मुकुंद भट्टड, ओमकार भट्टड, हर्षल जोशी, जय धाडीवाल, निखिल खुबानी, प्रशिल ठोळे, शुभम अग्रवाल, यश विसपुते, सर्वेश मंडलिक, हिमांशू छाजेड, अक्षय धाडीवाल वैभव भडकवाड, सम्यक फुलफगर आदी लिओ क्लब ऑफ कोपरगाव पदाधिकारी, सदस्य यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रदीप साखरे यांनी केले. उपस्थितांचे आभार धीरज कराचीवाला यांनी मानले.

# अक्षरा आघाडे आणि संस्कृती गायके यांची महाराष्ट्र फूटबॉल संघात निवड



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**लोणी :** जम्मू येथे होणाऱ्या शालेय राष्ट्रीय फूटबॉल स्पर्धा १७ वर्षे वयोगटात प्रवरा कन्या विद्यामंदिरच्या अक्षरा आघाडे व संस्कृती गायके या दोन खेळाडूंची महाराष्ट्र संघात निवड झाली.

या विद्यार्थिनींना विद्यालयाच्या क्रीडा शिक्षिका व फूटबॉल प्रशिक्षक विद्यादेवी घोरपडे, प्राचार्या भारती कुमकर, संस्थेच्या शिक्षण संचालिका लिलावती सरोदे यांचे विशेष मार्गदर्शन व सहकार्य लाभले. जम्मू येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी या विद्यार्थिनीना संस्थेचे अध्यक्ष ना. राधाकृष्ण विखे, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष शालिनीताई विखे, माजी खासदार डॉ. सुजय विखे, संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुष्मिता विखे, अतिरिक्त मुख्य अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शिवानंद हिरेमठ आदींनी शुभेच्छा दिल्या आहेत.

# केंद्रस्तरीय गुणदर्शन स्पर्धेत नायगाव शाळेचे यश



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** तालुक्यातील नायगाव जुने प्राथमिक शाळेने गोंडेगाव प्राथमिक शाळेत नुकत्याच झालेल्या केंद्रस्तरीय विविध गुणदर्शन स्पर्धेत प्रथम क्रमांकाची सहा, द्वितीय क्रमांकाची दोन व तृतीय क्रमांकाचे एक अशी बक्षिसे मिळवून नेत्रदीपक यश मिळवले आहे.

हस्ताक्षर स्पर्धेत किलबिल गटात आरोही दातीर व बालगटात वेद नजन यांनी केंद्रात प्रथम क्रमांक पटकाविला आहे. वक्तृत्व स्पर्धेत किलबिल गटात रुद्र लहारे व बालगटात कैवल्य दरेकर यांनी प्रथम क्रमांक पटकाविला आहे. वेशभूषा सादरीकरण स्पर्धेत किलबिल गटात आरोही दातीर व बालगटात श्रुती लांडे यांनी प्रथम क्रमांक पटकाविला. वैयक्तिक गीत गायन स्पर्धेत किलबिल गटात प्रीती लांडे व बालगटात कैवल्य दरेकर यांनी दुसरा क्रमांक पटकाविला. समूहगीत गीतगायन स्पर्धेत लहान गटात श्रावणी लांडे, श्रुती लांडे, कावेरी वाघ, कोमल वाघ, वैष्णवी राशिनकर, ओम राशिनकर, कृष्णा लांडे, वेदांत भुसारी, आदित्य लहारे, लौकिक लांडे, कैवल्य दरेकर या विद्यार्थ्यांनी तिसरा क्रमांक पटकाविला आहे. या सर्व विद्यार्थ्यांना शाळेचे मुख्याध्यापक संतोष वाघमोडे व शिक्षिका सुजाता सोळसे यांचे मार्गदर्शन लाभले.शाळेच्या या यशाबद्दल सर्व ग्रामस्थ व पालकांनी अभिनंदन केले आहे.

रामपूर कोकरे येथील महिलांनी धारण केला दुर्गेचा अवतार

समजावून सांगितले. त्याने न ऐकल्याने आक्रमक महिलांनी काडीची पेटी आणि पेट्रोलच्या साह्याने सदर झोपडी वजा ग्रीन शेडला आग लावून दिली. आगीत अवैध दारू दुकानचे नुकसान झाले. त्यानंतर या महिलांनी आपला मोर्चा येथील गोदावरी नदीच्या पलीकडे वीरगाव पोलीस स्टेशनच्या हद्दीत असलेल्या बाभूळगाव गंगा शिवारातील हॉटेलमध्ये जाऊन संबंधित हॉटेल दुकानदाराला समज देत आमच्या गावातील लोकांना/ मुलांना दारू न देण्याचा सल्ला दिला होता. तरीही दारू दिल्याने सदर महिलांनी हॉटेलच्या पाठीमागे जाऊन उसात लपविलेल्या सुमारे १०० पेक्षा अधिक बाटल्या रस्त्यालगत आणून फोडल्याने मोठ्या प्रमाणात काचाचा खच जमला होता. महिलांच्या गर्दीमुळे वाहनांचीदेखील कोंडी झाली होती.

आंदोलनात छबुबाई धनवटे, बबई धनवटे, ताराबाई इरसे, संगीता कोळेकर, रुपाली कुसळकर, रुक्मिणी उपळकर, विजया खैरे, संगीता खैरे, सुरेखा पिटेकर, इथाबाई पांढरे, सुमनबाई जाधव, रेखा जाधव, सुनीता धनवटे, ज्योती पांढरे,आशाबाई पांढरे, रेश्मा धनवटे, सुमनबाई धनवटे, आशाबाई भडांगे, मनीषा धनवटे, वैशाली कोळेकर, सुरेखा धनवटे, मनीषा उपळकर, स्वाती कोळेकर, रेखा कुसळकर, पिटेकर, कोमल धनवटे, सोनाली धनवटे आदी महिला सहभागी झाल्या होत्या.

=====================================

जुन्या वादातून भरदिवसा माजी उपसरपंचाचा खून

रुग्णालयात नेले, घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड, पोलीस उपनिरीक्षक विजय मस्कर, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक विकास कुंभार, पोलीस हवालदार संदीप कारंडे, अमोल नलगे, गणेश करपे, राजेश माने, सचिन होळकर, अमोल दांडगे, प्रतिक जगताप, उमेश जायपत्रे, नारायण वाळके यांसह आदींनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा करत परिस्थिती आटोक्यात आणली, तर गिलबिले यांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी वाघोली येथे हलवण्यात आले मात्र उपचारापूर्वी दत्तात्रय बंडू गिलबिले (वय ५२ रा. कोयाळी पुनर्वसन शिक्रापूर ता. शिरुर जि. पुणे) यांचा मृत्यू झाला, याबाबत रोहिणी दत्तात्रय गिलबिले (वय ४२ रा. कोयाळी पुनर्वसन शिक्रापूर ता. शिरुर जि. पुणे) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी पप्पू नामदेव गिलबिले (रा. कोयाळी पुनर्वसन शिक्रापूर ता. शिरुर जि. पुणे) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला मात्र पप्पू गिलबिले हा हल्ल्यानंतर फरार झाला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विजय मस्कर हे करत आहे.


सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

**सोमवार दि. ०२ डिसेंबर २०२४**

**मिलनम डे**

उदय-अस्त — सिंगल ५-१-९ मजबुत

| | | जोड |
|---|---|---|
| २७० ४५० १४४ | ९ - ० | १९० २३५ ४६० | १९-९५-२०-०७-६३ |

**कल्याण**

उदय-अस्त — सिंगल ९-४-५ मजबुत

| | | जोड |
|---|---|---|
| १४६ १२८ २९० | १ - २ | १२५ १७० ६६० | ४१-१०-६२-२५-९८ |

**मुंबैम (मेन)**

उदय-अस्त — सिंगल ४-७-९ मजबुत

| | | जोड |
|---|---|---|
| १५० २४० ३३० | ६ - ४ | १५८ २२० ४४६ | १६-६५-२४-४८-९३ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

द • ख • ल



## ॲड. विजय कराड यांना संघर्ष योध्दा पुरस्कार प्रदान

**ढोरजळगांव :** शेवगांव तालुक्यातील ढोरजळगांवने येथील अँड विजय उत्तम कराड यांना बहुभाषिक भाऊ बाबा वंजारी संघ महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने दिला जाणारा २०२४ चा संघर्ष योध्दा पुरस्कार नुकताच सुशिला मोराळे व संस्थापिका व अध्यक्षा लक्ष्मी गरकळ यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी महादेव दराडे, नवनाथ खेडकर,बाळासाहेब ढाकणे,केशव चेमटे,केशव खेडकर,शिवाजी बडे,बुवासाहेब केकाण, रामेश्वर केसभट, श्रीकृष्ण गंगावणे, बम्हनाथ डाके, प्रगत कराड,विजय पाटेकर, किरण हबंर विकास देशमुख,सरपंच सचिन बेळगे आदी उपस्थित होते.

अँड विजय कराड यांना संघर्ष योध्दा पुरस्कार मिळाल्याबद्दल त्याचे शेवगांव तालुका बार असोसिएशनचे अध्यक्ष, उपाध्यक्ष,सचिव व सदस्य यांनी अभिंनदन केले आहे.

## मिरीत ग्रामस्थांची मोफत नेत्र तपासणी

**अहिल्यानगर :** पार्वतीबाई सुखदेव वेताळ सामाजिक विकास संस्था व बुधराणी हॉस्पिटल (पुणे) यांच्या संयुक्त विद्यमाने मिरी (ता. पाथर्डी) येथील ग्रामस्थांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली. तर शिबिरातील २९ गरजू रुग्णांवर मोफत मोतिबिंदू शस्त्रक्रिया होणार आहे. या शिबिरास गावाच्या पंचक्रोशी परिसरातील ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. वेताळ सामाजिक संस्था मागील २३ वर्षापासून गरजूंना आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देत असून, संस्थेचे हे २३१ वे शिबिर होते. शिबिराचे उद्घाटन अखिल भारतीय सेनेचे जिल्हाध्यक्ष तथा कांदा व्यापारी आदिनाथ वनारसे यांच्या हस्ते झाले. ह.भ.प. गिरीधारी डहाळे महाराज यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमासाठी ग्रामस्थांनी मोठी गर्दी केली होती. आदिनाथ वनारसे म्हणाले की, ग्रामीण भागात आरोग्याबद्दल जागृती निर्माण करुन, आरोग्य सेवा पोहचविणे महत्त्वाचे बनले आहे. सातत्याने पार्वतीबाई सुखदेव वेताळ सामाजिक विकास संस्था विविध उपक्रमाद्वारे ग्रामीण भागातील ग्रामस्थांना आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देत आहे. सर्वसामान्य वर्गाला महागाईच्या काळात आरोग्यसेवा घेणे परवडत नाही. सर्वसामान्यांची सोय होण्यासाठी आरोग्य शिबिर नागरिकांसाठी आधार ठरत असल्याचे त्यांनी सांगितले. ह.भ.प. गिरीधारी डहाळे महाराज यांनी संस्थेच्या माध्यमातून माणुसकीच्या भावनेने राबविण्यात येणारे शिबिराचे उपक्रम दिशादर्शक असल्याचे स्पष्ट करुन संस्थेच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले. शिवाजी वेताळ म्हणाले की, समाज निरोगी करण्यासाठी संस्थेच्या माध्यमातून आरोग्य चळवळ उभी करण्यात आली आहे. समाजात आरोग्याचे प्रश्न मोठ्या प्रमाणात भेडसावत आहे. महागाईच्या काळात सर्वसामान्यांना आधार देण्यासाठी उपक्रम राबविले जात असल्याचे त्यांनी सांगितले. या शिबिरात तज्ञ डॉक्टरांनी २२१ ग्रामस्थांची तपासणी केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ड. स्नेहा शिवाजी वेताळ यांनी केले. अनिता शिवाजी वेताळ यांनी आभार मानले.

## जागतिक एड्स दिन विविध उपक्रमातून साजरा




**शेवगाव :** माय भारत, युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालय भारत सरकार चे नेहरू युवा केंद्र अहमदनगर, निर्मलाताई काकडे आर्ट्स कॉमर्स सायन्स कॉलेज शेवगाव, श्री आदिनाथ ग्रामीण बहुउद्देशीय संस्था, एकात्मिक सल्ला व चाचणी केंद्र ग्रामीण रुग्णालय शेवगाव यांचे वतीने जागतिक एड्स दिनानिमित्त निर्मलाताई काकडे कॉलेज कॅम्पस शेवगाव येथे विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पांडुरंग दुकळे, ॲड. श्रीकृष्ण मुरकुटे, समुपदेशक सुजाता दहिफळे, पृथ्वीराज कराळे, प्रा. अरुण घोडके सर, ने.यु.केंद्र तालुका समन्वक रोहिणी काकडे, सरताज शेख आदी उपस्थित होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुकळे सर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना एड्स दिन पाळण्यामागची भूमिका सांगितली. एड्स चे धोके यासाठी घेण्याची पूर्व काळजी स्पर्धेच्या माध्यमातून युवकांनी जनजागृतीवर निबंध स्पर्धे तून हा आजार हद्दपार करण्यासाठी विचार मांडले. प्रमुख मार्गदर्शक व त्या सुजाता दहिफळे यांनी एच आय व्ही ही व्हीप्याटायटिस(पांढरी) सिपलीस कारणे उपाय योजना व उद्दिष्टे याबाबत माहिती दिली. तसेच एचआयव्ही कायदा २०१७ कलंक व भेदभाव विरहित वागणूक बांधिलकी हेल्पलाइन १०९७ , एचआयव्ही संसर्ग धोका आणि त्यातून एचआयव्ही लागण होणे यावर सविस्तर मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन निकिता बोरुडे यांनी केले तर आभार चैतन्य आमटे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी महाविद्यालयाच्या शिक्षकांनी तसेच युवक मंडळाच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

# विजेच्या लाईनसाठी झाडांवर वीज कंपनीची कुऱ्हाड

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**करंजी :** गेल्या दोन वर्षापासून करंजी महावितरण कपंनी कार्यालया अंतर्गत दहा बारा गावात चोवीस तास सिंगल फेज वीज देण्यासाठी विजेचे खांब, विजेच्या तारा ट्रान्सफार्म उभे करण्याचे काम अतिशय संथ गतीने व सर्व नियम डावलून संबधित कंपनीच्या ठेकेदाराकडून सुरु आहे. या कामावर महावितरणच्या प्रमुखांसह सार्वजनिक बांधकाम विभागाने देखील पद्धतशीरपणे डोळेझाक करून या कंपनीला पाठीशी घालण्याचे काम केले आहे त्यामुळेच ज्या राज्य मार्गावरून ही विजेची लाईन टाकली जात आहे त्या लाईन साठी रस्त्याच्या पाच दहा फुटावरच लोखंडी पोल उभे करण्यात आले आहेत सार्वजनिक बांधकाम विभागाचे नियम अक्षराच्या धाब्यावर बसवत हे पोल रस्त्याच्या कडेला उभारण्यात आल्याने भविष्यात निश्चितपणे हे पोल अपघाताला कारण ठरणार आहेत एवढेच नव्हे तर नव्याने विजेच्या तारा टाकण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा बाजूने असलेले अनेक मोठमोठ्या झाडांची खुलेआम कत्तल या ठेकेदाराकडून केले आहे असुन याकडे सार्वजनिक बांधकाम विभागाने करण्यात आलेली आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याशी झालेल्या अर्थपूर्ण संबंधामुळेच रस्त्याच्या कडेला नियम डावलून लाईटचे पोल उभारण्यात आले असल्याचा आरोप आदर्श गाव लोहसरच माजी सरपंच अनिल गीते पाटील यांनी केला आहे.सार्वजनिक बांधकाम विभागाची डोळेझाक आणि संबंधित वीज कंपनीची मनमानी या विरोधात दिनांक दहा डिसेंबर रोजी करंजी येथे कल्याण निर्मळ या राष्ट्रीय महामार्गावर परिसरातील ग्रामस्थ शेतकरी यांच्या उपस्थितीत रस्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा देखील गीते पाटील यांनी निवेदनाद्वारे दिला आहे. करंजी चिचोंडी रस्ता लोहसर राघोहिवरे मिरी रस्ता असेल या संपूर्ण परिसरामध्ये या कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी सर्व नियम डावलून खांब व तारा उभारण्याचे काम पद्धतशीरपणे डोळेझाक केलेली आहे. या ठेकेदाराने उभे केलेले खांब व ट्रान्सफार्म पूर्णपणे रस्त्यालगत असलेल्या साईट पट्टीत म्हणजे डांबरी रोडलगत पाच सात फुटावर उभे केले आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाची रोड हद्द डांबरी रोडच्या मध्यापासून पंधरा मिटरची आहे या अंतरावरच पाण्याच्या पाईपलाईन, ऑप्टिकलं फायबर केबल,किंवा वीज खांब व विजवाहक तारा टाकणे बंधनकारक आहे. संबधित ठेकेदाराने रस्त्यालगत खांब उभारले असून विजवाहक तारा टाकताना या पुर्ण लाईन खालील हजारो झाडांची तोड या ठेकेदाराने केली आहे. दहा बारा गावातील रस्त्यालगत असलेल्या हजारो झाडांचे फक्त बुंधे ठेवलेत याल जबाबदार कोण. सार्वजनिक बांधकाम विभागाने देखील याबाबत नेहमीच उडवाउडवीची उत्तरे दिली आहेत. या संपूर्ण कामाची चौकशी होवुन संबधित ठेकेदार व अधिकारी यांच्यावर कारवाई करावी अन्यथा लोहसरसह परिसरातील ग्रामस्थांच्या वतीने करंजी येथे १० डिसेंबर रोजी रास्तारोको आंदोलन तर १६ डिसेंबर रोजी अहिल्यानगर सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालया समोर बेमुदत उपोषणास बसण्याचा इशारा सरपंच गीते पाटील यांनी दिला आहे.

## मुकुंदनगरमध्ये ज्येष्ठ नागरिक संघटनेची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** फकिरवाडा, दर्गादायरा, मुकुंदनगर येथील ज्येष्ठ नागरिक संघटनेची वार्षिक सर्वसाधारण सभा पार पडली. या सभेत ज्येष्ठ नागरिक संघाच्या कंपाउंड वॉल व सभागृहासाठी ५६ लाखांचा निधी दिल्याबद्दल आमदार संग्राम जगताप यांचे आभार मानून, तिसऱ्यांदा आमदारपदी निवडून आल्याबद्दल त्यांचा अभिनंदनाचा ठराव घेण्यात आला. वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी प्रमुख पाहुणे म्हणून हाजी शौकत तांबोळी, हाजी लतीफ मलबारी, माजी नगरसेवक आसिफ सुलतान, फारुक भाई, नवेद बिजापुरे, शेख अब्दुलरहिम (गोटु जहागीरदार), पठाण इब्राहिम हबीबखा, मिर्झा नवेद अंजुम गयासुल हक, शेख हबीब जमाल, सय्यद इकबाल गुलाम दस्तगीर, ड. सय्यद मो. अन्वर इब्राहिम, अब्दुल अजीज हैदरमियाँ, शेख गुलामदस्तगीर मोहीद्दीन, शेख इस्माईल पापामियाँ, हाजी शेख अब्दुल सईद हाफिज, सय्यद आरिफ नन्हेमियाँ, हाजी शेख शरफोद्दीन जैनुद्दीन,पठाण हबीब मगबुल, सय्यद नुरमोहंमद बाबासाहेब, कायदेशिर सल्लागार, ॲड. हाफिज जहागीरदार, ॲड. ताज अशरफ सय्यद आदी उपस्थित होते.




## जनावरांची माहिती देऊन रखडलेली पशुगणना होणार

### जनावरांना बिल्ले टॅगीन करण्याचे आवाहन



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कर्जत :** कर्जत तालुक्यात निवडणुकीमुळे रखडलेली २१ वी पशुगणना पशुसंवर्धन विभागाच्या वतीने राबविण्यात येत आहे. पशुपालक शेतकऱ्यांनी पाळीव जनावरांची माहिती पशुवैद्यकीय प्रगणकांना देण्याबरोबरच जनावरांना बिल्ले टॅगीन करण्याचे आवाहन डॉ कांबळे यांनी केले आहे.

कर्जत पंचायत समितीचे तालुका पशुसंवर्धन आधिकारी डॉ.बाळकृष्ण कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील पशुगणनेसंदर्भात ३ पर्यवेक्षकांसह, पशुवैद्यकीय अधिकारी आणि १७ प्रगणकांची प्रशिक्षण कार्यशाळा कर्जत पंचायत समितीच्या सभागृहात पार पडली. या कार्यशाळेत पशुगणनेसंदर्भात चित्रफितीद्वारे मार्गदर्शन करण्यात आले. ही पशुगणना पशुवैधकीय अधिकारी डॉ. बाळकृष्ण कांबळे, डॉ. राम अनभुले, डॉ. प्रेरणा सावळे या पर्यवेक्षकांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येणार आहे

यामध्ये गाय, म्हैस, शेळ्या, मेंढ्या, कोंबड्या आदींसह भटक्या गायींची पशुगणना करण्यात येणार आहे. सध्या तालुक्यात

११५६००हजार गायी गटातील, २२७०० म्हैस गटातील व १३३७००शेळ्या-मेंढ्या, तर २लाख १५ हजार कोंबड्या, अशी नोंद झाली आहे. पशुपालकांनी आपल्या सर्व पाळीव जनावरांची नोंद करून घ्यावी, तसेच मोकाट भटक्या गायींची गणना करण्यात येणार असल्याची माहिती पशुसंवर्धन अधिकारी डॉ. कांबळे यांनी दिली.

दरम्यान, कर्जत तालुक्यातील नव्याने पशुसंवर्धन विभागाच्या वतीने पशुगणना मोबाइल ॲपद्वारे करण्यास संपूर्ण देशासह राज्यासह कर्जत तालुक्यात पशुगणना करण्याचा शुभारंभ करण्यात आला आहे. पशुपालक शेतकऱ्यांनी आपल्या जवळील विविध गटांतील पाळीव जनावरांची नोंदणी करण्यासाठी येणाऱ्या प्रगणकास माहिती देण्याचे आवाहन डॉ बाळकृष्ण कांबळे यांनी केले आहे.

## लाकूड तस्करी जोमात; वनविभाग कोमात!

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** एकीकडे वृक्षसंपदा वाढविण्यासाठी शासनाकडून विविध पातळ्यांवर प्रयत्न सुरू असताना श्रीगोंदा तालुक्यात मात्र उलट चित्र दिसून येत आहे. शासकीय यंत्रणांच्या दुर्लक्षाने तालुक्यात लाकूड तस्करांनी अक्षरश: थैमान मांडले असून, मोठमोठी झाडे तोडण्यात येत असल्याने पर्यावरणाचे अपरिमित नुकसान होत आहे. तोडलेल्या मोठमोठ्या झाडांच्या लाकडांचे फळ्या-बल्ल्या/ गोल लाकडी खांब करून मोठ्या शहरांत विकण्याचा नवा गोरखधंदा तालुक्यात फोफावला असून, कोमात गेलेल्या वनविभागाचे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे.

राज्य सरकार पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी विविध योजनांतून शासनाच्या ग्रामविकास विभागामार्फत मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड केली जाते. पर्यावरणातील होत असलेले बदल त्याचा शेती व शेती उद्योगांवर होत असलेले वाईट परिणाम कमी करण्यासाठी वृक्ष लागवडीच्या योजना राबविण्यात येत आहेत. मात्र, तालुक्यात गेल्या अनेक वर्षांपासून मोठ्या प्रमाणात वृक्षतोड सुरू आहे. पेडगाव यासह विविध ठिकाणच्या तस्करांकडून शासकीय व खासगी जमिनीवरील मोठी झाडे हेरून ती तोडली जातात. नंतर विनाक्रमांकाच्या वाहनांद्वारे जळाऊ लाकूड म्हणून आरा गिरणी चालकांना पुरविली जातात. दिवसभर तोडण्यात आलेली ही लाकडे सायंकाळी विनाक्रमांकाच्या ट्रॅक्टरमध्ये भरून ती आरा गिरणी चालकांना पुरविली जातात.सर्वच आरा गिरण्यांच्या सभोवताली मोठमोठ्या लाकडांचा खच पडलेला दिसून येतो. जास्तीचा भाव मिळत असल्याने ट्रकमध्ये सिलबंद केलेली ही लाकडे गुजरात राज्यासह मुंबई-पुण्यासारख्या मोठ्या शहरांमध्ये पाठविण्यात येतात. या प्रकाराने श्रीगोंदा तालुक्यात वन क्षेत्र झपाट्याने कमी होत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. वनविभाग व पोलिस प्रशासनाचे मात्र याकडे दुर्लक्ष होत असल्याने तालुक्यात 'झाडे लावा, झाडे जगवा' नव्हे तर 'झाडे तोडा' अभियान राबविण्यात येत असल्याचे चित्र आहे.त्यामुळे तस्कर आणि वनविभागाचे अधिकारी यांची झुपी मिलीभगत असल्याचा आरोप नागरीकातून होताना दिसत आहे.

### श्रीगोंद्यात वाढीसाठी नव्हे; तोडीसाठी योगदान

श्रीगोंदा तालुक्याने दुष्काळाचे भयंकर चटके सहन केले आहेत. अशा अवस्थेत गेली दोन-चार वर्षे पाण्याची उपलब्धता असतानाही पर्यावरण वाढविण्यासाठी ठोस प्रयत्न झाले नाहीत. त्यातच आता वन अधिकारी व पोलिसांच्या आशीर्वादाने मोठ्या वृक्षांवर कुऱ्हाड चालविली जात आहे. दुष्काळी परिस्थितीचे चटके सोसणाऱ्या तालुक्यात मोठमोठ्या डेरेदार वृक्षांची सर्रास कत्तल सुरू आहे. लाकडांची वाहतूक करणाऱ्या ट्रक टेम्पो व लाकडी गिरण्यांमधील अवैध साठ्याबाबतची माहिती वनविभागाला कळवूनही कारवाई होत नाही. वनविभागातील अधिकारी, कर्मचारी व पोलिस प्रशासनाचे अभय असल्याशिवाय लाकूड तस्करीसारखे प्रकार होणे अशक्य आहे.असे नागरीकातून खुलेआम बोलले जात आहे

### पकडलेल्या ट्रकमधील फळझाडांचे लाकूड काढून केला पंचनामा

काही दिवसापूर्वी वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी पेडगाव परिसरात लाकडाची अवैध वाहतूक करणारा टेम्पो पकडला होता मात्र तो कार्यालयाकडे नेताना त्यातील आंबा चिंच तसेच काही जांभळाची लाकडे वनाधिकाऱ्याच्या सल्ल्याने काढून घेतली गेली आणि मग त्याचा पंचनामा करून वरिष्ठ कार्यालयाला अहवाल पाठविण्यात आला मात्र दंडाची रक्कम कमी होण्यासाठी श्रीगोंद्यातील अधिकाऱ्यांनी मोठी तडजोड केली असल्याची जोरदार चर्चा ऐकण्यास मिळत आहे

## आ. अमित गोरखे यांना कॅबिनेटमध्ये मंत्रिपद द्या : मिसाळ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**शेवगाव :** विधान परिषदचे आमदार भाजपचे नेते देवेंद्र फडवणीस यांच्या अत्यंत जवळचे सहकारी उच्च विद्या विभूषित व मातंग समाजाचे प्रतिनिधित्व करणारे आमदार अमित गोरखे यांना मंत्रिमंडळ घ्या अशी महाराष्ट्रातील दलित मागणी समाजाची आहे. आमदार अमित गोरखे यांची विधानपरिषदेवर नियुक्ती झाल्यावर त्यांनी बहुजन संवाद यात्रा मंत्रिपदापर्यंत पोचणार. संविधानाबाबत नॅरेटिव्ह बदलल्याने आमदार गोरखे यांना लाभ होण्याची शक्यता मातंग समाजाचे युवानेते म्हणून राज्यात काढलेल्या 'बहुजन संवाद यात्रे'चा लाभ भाजपचे आमदार अमित गोरखे यांना होणार व त्यांची वर्णी राज्याच्या नवनिर्वाचित मंत्रिमंडळात लागणार याबाबत भाजपसह राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे. लोकसभा निवडणुकीच्याकाळात 'संविधान बदलणार' या 'नॅरेटिव्ह'चा फटका भारतीय जनता पक्षाला मोठ्या प्रमाणात बसला होता. राज्याचे भाजपचे नेते, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावर योजना आखली. त्यानुसार विधान परिषदेवर आमदार म्हणून अमित गोरखे या मातंग समाजातील तरुण व उच्च शिक्षित नेतृत्वाची वर्णी लागली. फडणवीस यांनी दिलेल्या संधीचे सोने करत गोरखे यांनी राज्यभर ३० जिल्ह्यातील ७८ विधानसभा मतदारसंघातून ३१ हजार किलोमीटर बहुजन संवाद यात्रा काढली. त्यामुळे बहुतांश प्रमाणात अनुसूचित जाती या प्रवर्गात 'संविधान बदला'चे नॅरेटिव्ह खोडण्यात आमदार गोरखे यांना यश आले, अशी भाजप वर्तुळात चर्चा आहे.

भाजपमध्ये मातंग समाजाचे तीन आमदार मंत्री पदाच्या इच्छुक आहेत. त्यापैकी पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघातून सुनील कांबळे, नांदेडमधील देगलूर विधानसभा मतदारसंघातून जितेश अंतापूरकर निवडून आले आहेत. तर; आमदार गोरखे यांची विधान परिषदेवर नियुक्ती झालेली आहे. आमदार दिलीप कांबळे यांना निवडणुकीपूर्वी अण्णा भाऊ साठे महामंडळाचे अध्यक्षपद दिलेले आहे. तर; आमदार अंतापूरकर हे नुकतेच दोन महिन्यांपूर्वी भाजपमध्ये आलेले आहेत. तर गोरखे यांच्या राज्यव्यापी दौऱ्यामुळे समाज घटकात पक्षाचा माणूस म्हणून त्यांचे नाव पोहचले आहे.

# जीवनामध्ये पैशापेक्षा मित्रत्वाचे नाते अखंड ठेवा : लगड

## तब्बल वीस वर्षानंतर व्यंकनाथ विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची गळाभेट




**लिंपणगाव :** जीवनामध्ये पैशापेक्षा प्रत्येकाने मित्रत्वाचे नाते अधिक ऋणानुबंधाचे ठेवावे; संपत्ती हे क्षनिक आहे. तेव्हा प्रत्येकाने एकमेकांच्या संकटात उभे राहावे; तोच खरा आपला मित्र असतो. असे भावनिक उदगार माजी प्राचार्य आर के लगड यांनी आयोजित स्नेह मेळाव्या प्रसंगी बोलताना व्यक्त केले.

श्रीगोंदा तालुक्यातील श्री व्यंकनाथ विद्यालयाच्या एसएससी मार्च २००३- ०४ या शैक्षणिक वर्षातील विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा आयोजित करण्यात आला होता. अध्यक्षस्थानी माजी प्राचार्य आर के लगड हे होते. या मेळाव्या प्रसंगी वीस वर्षानंतर आपले वर्गमित्र भेटल्याने याप्रसंगी सर्वांनी एकमेकांशी गळा भेट घेत शालेय जीवनातील जुन्या आठवणींना उजाळा देत यावेळी भावनिक वातावरण तयार झाले होते. याप्रसंगी आजी-माजी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा यावेळी सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी माजी विद्यार्थी शिवलिंग क्षीरसागर यांनी यावेळी गुरुर्देव गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरा असे म्हणत ज्ञानदान करणारे शिक्षक हेच खरे आपल्या जीवनाला आकार देणारे खरे गुरु आहेत. शालेय जीवनात गुरूंनीच आम्हाला संस्कार विचारांचे उत्तम प्रकारे संस्कार दिल्याने आम्ही आज सक्षम झालो असल्याचे आवर्जून सांगितले. यावेळी जेष्ठ पत्रकार बाळासाहेब काकडे यावेळी म्हणाले की; शालेय जीवनात शिक्षकांकडून बुद्धीला शाळेतून चालना मिळाली; त्या ज्ञान मंदिराला व गुरूला विसरता कामा नये. माजी विद्यार्थ्यांनी आपला शालेय ग्रुप तयार करून शाळेला वेळोवेळी मदत करण्याचे आव्हान केले.

याप्रसंगी गणेश काकडे; प्रा. निसार शेख; गिरे सुनीता खेडेकर; मोहिनी आत्रे; शिक्षक सर्वश्री संजय दळवी; पांडुरंग बोडखे; अरुण रायकर; मधुकर खेडकर; चिखले सर; राणीताई झेंडे; मुख्याध्यापक बाळासाहेब जठार; आदींनी शालेय जीवनातील गुरु शिष्याचे महत्त्व व शिक्षकाची भूमिका किती प्रामाणिक असते याविषयी सखोल असे मार्गदर्शन केले.

यावेळी मार्गदर्शन करताना विद्यालयाचे प्राचार्य ए एल पुराणे यावेळी म्हणाले की; एसएससी मार्च २००३-०४ यावर्षी वर्गशिक्षक म्हणून काम पाहत असताना अगदी प्रामाणिकपणे ज्ञानदान पार पाडले. आणि आता त्याच विद्यालयात प्राचार्य म्हणून कार्यरत आहे. या बॅचची बारा मुले उच्चशिक्षित होऊन उच्च पदावर नोकरी करतात. अन्य विद्यार्थी विविध क्षेत्रात उद्योजक व व्यावसायिक बनले. त्यातून खरा मनस्वी आनंद लाभला. विद्यार्थ्यांनी मित्रांच्या नात्याला अधिक महत्त्व द्यावे. आमच्या सन्मानापेक्षा आपल्या विद्यालयाकडे अधिक लक्ष द्यावे; असा सल्ला देत श्री पुराने पुढे म्हणाले की; स्थापनेपासून व्यंकनाथ विद्यालयाचा उच्चांकी निकाल; शालेय शिस्त; विविध स्पर्धा त्यातून विद्यार्थ्यांना मिळालेले भरीव मार्गदर्शन त्यामुळे तालुक्यात या विद्यालयाने प्रत्येक उपक्रमात भरारी घेतल्याचे सांगून विद्यार्थ्यांना पुढील उज्वल भविष्यासाठी प्राचार्य पुराणे यांनी शुभेच्छा व्यक्त केल्या.

या कार्यक्रमास एस एस सी मार्च २००३-० ४ चे सर्व माजी विद्यार्थी;; विद्यार्थिनी; शिक्षक तुषार नागवडे सर; सेवक भाऊसाहेब राऊत; एकनाथ नेटवटे; पत्रकार नंदकुमार कुरुमकर; राहुल येरकळ आदी यावेळी उपस्थित होते. सूत्रसंचालन माजी विद्यार्थी सुरेश काकडे यांनी केले. आभार गणेश धाकड यांनी मानले.

द•ख•ल

## 'ईव्हीएम हटाओ देश बचाओ', संभाजी ब्रिगेडचे आंदोलन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पिंपरी :** येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात संभाजी ब्रिगेडच्या वतीने ईव्हीएम विरोधात धरणे आंदोलन केले. यावेळी इव्हीएम हटवून मतपत्रिकेवर मतदान घेण्याची मागणी संघटनेच्या वतीने केली. 'चौकशी न झाल्यास जनतेतून मोठा उठाव होऊन ईव्हीएम हटविले जाईल,असा सूर विविध सामाजिक पदाधिकाऱ्यांनी आळविला. या वेळी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मानव कांबळे, माजी नगरसेवक मारुती भापकर, मराठा सेवा संघाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रकाश जाधव, धम्मराज साळवे, शांताराम खुडे, रोहिनाज शेख, प्रदीप पवार, संजीवनी पुराणिक, सीपीएमचे सचिन देसाई, संतोष शिंदे, शरद थोरात आदींनी मनोगत व्यक्त केले.शहराध्यक्ष सतीश काळे म्हणाले, 'लोकशाहीमध्ये जनता सर्वश्रेष्ठ आहे. जनतेला अपेक्षित असलेले मुद्दे, शासकीय धोरणे राबविण्याबरोबरच जनताच या देशातील सत्तेत बसणाऱ्या लोकप्रतिनिधींचे भवितव्य ठरवत आहे. मात्र सत्तेचा गैरवापर करून जेव्हा जनतेच्या हातातून अनेक गोष्टी घालविल्या जातात. तेव्हा जनतेमध्ये मोठा असंतोष निर्माण होतो. निकालाची योग्य चौकशी करावी.'

## तोतया डॉक्टरला न्यायालयाकडून दोन वर्षाची शिक्षा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** वैद्यकीय पदवी नसताना रुग्णांवर उपचार करणाऱ्या तोतया डॉक्टरला न्यायालयाने दणका दिला. खडकी न्यायालयातील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी एल. व्ही. श्रीखंडे यांनी तोतया डॉक्टरला दोन वर्ष सक्तमजुरी आणि दोन हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. दंड न भरल्यास १५ दिवस अतिरिक्त कारावास भोगावा लागेल, असे न्यायालयाने आदेशात म्हटले आहे.

मीलनकुमार अमर ठाकूर (वय ३४, रा. धानोरी, मूळ रा. पश्चिम बंगाल) असे शिक्षा सुनावलेल्याचे नाव आहे. ठाकूर वैद्यकीय पदवी नसताना रुग्णांवर उपचार करत होता. याबाबतची माहिती महापालिकेच्या आरोग्य विभागाला मिळाली. त्यानंतर महापालिकेच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. रेखा उमेश गलांडे यांनी विश्रांतवाडी पोलिसांकडे तक्रार दिली. पोलिसांनी कारवाई करून ठाकूरला ताब्यात घेतले. त्याच्याविरुद्ध विश्रांतवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. त्याच्या दवाखान्यात औषधांचा साठा सापडला होता.

## शिरुर एसटी आगारात झोपलेल्या चालकावर हल्ला

**तळेगाव ढमढेरे, प्रतिनिधी:**

शिरुर शहरातील एस टी आगाराच्या चौकशी कक्षामध्ये एस टी चालक संभाजी बर्गे हे झोपलेले असताना शिवधर सहानी हा इसम अचानकपणे हातामध्ये लोखंडी टामी घेऊन आला, त्याने अचानकपणे संभाजी यांच्यावर हल्ला करत जखमी केले, सदर घटनेत एस टी चालक संभाजी देवराम बर्गे (वय ४४ वर्षे रा. शहागड ता. आंबड जि. जालना) हे जखमी झाले असून याबाबत आगार व्यवस्थापक दिलावर अकबर तांबोळी (वय ५६ वर्षे रा. शिक्रापूर ता. शिरुर जि. पुणे) यांनी शिरुर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी शिवधर सहानी (रा. गोरखपूर उत्तरप्रदेश) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस हवालदार देविदास खेडकर हे करत आहे.

## कावळ्यांच्या हल्ल्यातून घुबडाला जीवदान



शिक्रापूर (ता. शिरुर) येथे कावळ्यांच्या हल्ल्यातून घुबडाला जीवदान देताना प्राणीमित्र.(छायाचित्र आकाश भोरडे)

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**तळेगाव ढमढेरे :**

शिक्रापूर (ता. शिरुर) येथील अजिंक्यतारा हॉटेल परिसरात काही कावळे एका घुबडावर हल्ला करत असल्याचे महेश वाघ यांना दिसले, याबाबतची माहिती मिळताच निसर्ग वन्यजीव सामाजिक संस्थेचे अध्यक्ष शेरखान शेख, शुभम वाघ, अमोल ,कुसाळकर यांनी घटनास्थळी धाव घेत शिताफीने सदर घुबडाला ताब्यात घेतले, सदर घुबडाला कावळ्यांच्या हल्ल्यात जखमी झाल्याने त्याला पुढील उपचारासाठी बावधन येथील शासकीय प्राणी अनाथालयाच्या सायली पिलाने, तय्यब सय्यद यांच्या ताब्यात देण्यात आले.

# सरकारी शेतजमीन मोजणीवेळी जमावाकडून पेटवून घेण्याचा प्रयत्न

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पाबळ :** सविंदणे (ता.शिरूर) येथे शेतजमिनीची सरकारी मोजणी करण्यासाठी आलेल्या कर्मचाऱ्यांना मोजणी करण्यास मज्जाव करण्यासाठी बेकायदेशीर जमाव जमवून अंगावर डिझेल ओतून घेत पेटवून घेण्याचा प्रयत्न केल्याची घटना शुक्रवारी (ता.२९) घडली. यावेळी बंदोबस्तासाठी असलेल्या पोलीसांनी रोखण्याचा प्रयत्न केला असता त्यांनाही अरेरावी करण्यात आली.



सविंदणे (ता.शिरूर) येथील शेतकरी मंदा तानाजी रोकडे यांनी त्यांच्या मालकीच्या जमिनीची हद्दकायम मोजणी करण्यासाठी भुमि अभिलेख कार्यालय शिरूर येथे अर्ज केला होता. त्यानुसार २० सप्टेंबर रोजी मोजणी मंजूर करण्यात आली होती. त्यावेळी काही व्यक्ती बेकायदेशीरपणे हरकत घेऊन वादविवाद करणार असल्याची शक्यता असल्याने अर्जदार यांनी सशुल्क पोलीस बंदोबस्त घेतला होता. परंतु त्यावेळी भिवा खुमाजी पडवळ, भक्तिराम शिवराम पडवळ, रतन दत्तात्रेय पडवळ यांसह त्यांच्या कुटुंबातील लोकांनी वादविवाद करत मोजणी कामात अडथळा निर्माण केला. त्यामुळे मोजणी होऊ शकली नाही.

तदनंतर पडवळ यांनी मंदा रोकडे यांच्या मालकीच्या जमीनीची मोजणी करण्यासाठी स्थगिती द्यावी म्हणून उपअधिक्षक भुमि अभिलेख व घोडनदी न्यायालयात अर्ज केला. परंतु न्यायालयाने स्थगिती देण्यासाठीचा अर्ज नामंजूर केला. त्यानंतर शुक्रवारी (ता.२९) रोजी मोजणी कर्मचारी पियुष बगाडे, पोलीस कर्मचारी व अर्जदार शेतात मोजणी करण्यासाठी गेले असता. तेथे भिवा खुमाजी पडवळ, भक्तिराम शिवराम पडवळ, रतन दत्तात्रेय पडवळ यांसह त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींनी सरकारी मोजणी करण्यासाठी आलेल्या कर्मचाऱ्यांना मोजणी करण्यापासून मज्जाव करण्यासाठी बेकायदेशीर जमाव जमवून अंगावर डिझेल ओतून घेत पेटवून घेण्याचा प्रयत्न केला. यावेळी बंदोबस्तासाठी असलेल्या पोलीसांनी त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला असता त्यांनाही अरेरावी करण्यात आली. तरीही भुमि अभिलेख अधिकारी व पोलिस प्रशासनाकडून गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ करण्यात येत असून बघ्याची भुमिका घेतली जात आहे. अर्जदार मंदा तानाजी रोकडे यांनी न्याय न मिळाल्यास आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. त्यामुळे भुमि अभिलेख व पोलीस प्रशासन कायदेशीर मार्गाने न्याय मागणा-या शेतकरी महिलेला न्याय देणार का? की, बघ्याची भुमिका घेत बेकायदेशीर कृत्य करणाऱ्यांना मोकळीक देणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

### मोजणी अधिकारी व पोलिसांच्या बघ्याच्या भूमिकेमुळे शेतकरी त्रस्त

शिरूर तालुक्यातील गावांमध्ये सरकारी मोजणी करणे शेतकऱ्यांना डोकेदुखी ठरत आहे. मोजणीसाठी अर्ज केल्यानंतर अनेकदा वर्षभर तारखा मिळत नाही. चिरीमिरी साठी अनेक प्रकरणे प्रलंबित ठेवण्यात येतात. त्यातही तारीख मिळाल्यास पोलीस बंदोबस्तात ही मोजणी होत नाहीत. सरकारी कामात अडथळा निर्माण करत अरेरावी करणा-यांवर कठोर कारवाई करण्यात येत नसल्याने घटना वाढ होत चालली आहे. भुमि अभिलेख कार्यालयातील अधिकारी व पोलीस अधिकारी एकमेकांकडे बोट दाखवत बघ्याची भुमिका घेत आहेत. त्यामुळे शेतकरी हतबल झाले आहेत.

## मंचर परिसरात बिबट्याचा वावर

### परिसरात भीतीचे वातावरण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**प्रतिनिधी - निरगुडसर**

मंचर ता. आंबेगाव येथील मुळेवाडी परिसरातील महालक्ष्मी रेसिडेन्सी इमारतीच्या आवारात रात्री आठ वाजून ४० मिनिटाच्या दरम्यान बिबट्या मुक्तपणे फिरत असल्याची घटना उघडकीस आली असून हा बिबट्या सोसायटीच्या आवारात फिरताना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. मंचर येथील सोसायटीतच बिबट्याचा वावर आढळून आल्याने परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे .मंचर येथील महालक्ष्मी रेसिडेन्सी सोसायटीच्या आवारात शनिवार दि. ३० रोजी रात्री राहुल रोहिदास थोरात यांच्या गोठ्याजवळही बिबट्या आला होता. तर महालक्ष्मी रेसिडेन्सी सोसायटीत दिनांक २८/११/२०२४ रोजी रात्री आठ वाजून ४० मिनिटांनी बिबट्या फिरत असल्याचे सीसीटीव्हीत कैद झाले. बिबट्या फिरत असल्याचे एका महिलेने पाहून आजूबाजूच्या कुटुंबांना सावध केले थोडा वेळ फिरून बिबट्या संरक्षक भिंतीवरून उडी मारून





निघून गेला. या परिसरात शेतकऱ्यांच्या गाईंचे गोठे असून गोठ्यांना बंदिस्त तारेच्या जाळ्या आहेत. ओढ्याच्या पलीकडे ऊस क्षेत्र असून दिवसभर बिबट्या ऊसात थांबतो व रात्रीच्या वेळी शिकारीच्या शोधात बाहेर पडतो अशी चर्चा सोसायटीत आहे. सदर बिबट्या पूर्ण वाढ झालेला असून त्याने यापूर्वीही येथील अनेक कुत्र्यांचा फडशा पाडला आहे. तसेच मेंढपाळाच्या कळपावरही हल्ले करून पाच ते सहा मेंढ्या ठार केल्याच्या घटना घडल्या आहेत. या परिसरात राहणारे नागरिक पराग मिल फ्रुट्स, मोरडे फुड्स तसेच चाकण येथे नोकरीला असून रात्रपाळी असलेल्या कामगारांची येथे सतत वर्दळ सुरू असते. तसेच अवसरी खुर्द येथील शासकीय अभियांत्रिकी व तंत्रनिकेतन महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या अनेक विद्यार्थी मुळेवाडी परिसरात वास्तव्याला आहेत या पार्श्वभूमीवर भविष्यात कुठलाही अनुसूचित प्रकार घडू नये यासाठी वनविभागाने बिबट्याला जेरबंद करावे अशी मागणी स्थानिक रहिवाशी योगिता थोरात व इतर नागरिकांनी केली आहे.

## माहूर विद्यालयात 'क' कथेचा, 'क' कवितेचा उपक्रम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**माळशिरस :** साने गुरुजींच्या शतकोत्तर रौप्यमहोत्सवी जयंतीनिमित्ताने साने गुरुजी १२५ अभियानांतर्गत साने गुरुजी कथामाला वरळीगाव यांच्या वतीने सासवड येथील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या माहूर (ता.पुरंदर) येथील माहूर माध्यमिक विद्यालयात 'क' कथेचा.. 'क' कवितेचा या साहित्यिक आपल्या विद्यालयात उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठी मनोरंजन आणि प्रबोधनात्मक कार्यक्रम आयोजित करण्यात आला. याप्रसंगी मुंबई वसईवाडा येथील ध्यास प्रतिष्ठान आणि कै शंकरराव पासलकर व कै जगदीश पासलकर यांच्या स्मरणार्थ पुणे येथील बाबुराव पासलकर प्रतिष्ठानच्या वतीने विद्यालयाच्या ग्रंथालयासाठी १५ हजार रुपयांची पुस्तके भेट देण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ध्यास प्रतिष्ठानचे सचिव, शिवव्याख्याते संजय पासलकर तर तर प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ साहित्यिक, कवी



माहूर (ता.पुरंदर) येथे साहित्यिक आपल्या विद्यालयात उपक्रम राबविण्यात आला.

रमेश तांबे होते. पासलकर यांनी अंधश्रद्धा निर्मूलन, स्त्री शिक्षण, संत महिमा यांची माहिती देत चारोळ्या सादर केल्या. तर कवी तांबे यांनी बालसाहित्यातून विद्यार्थ्यांचे मनोरंजन करत आदर्श व्यक्तिमत्व, शेतातील भाजीपाला, शिक्षा, स्वप्न, खिडकीतून डोकावताना मनाची निर्भयता आदी कविता सादर केल्या. याबरोबरच स्वतः ची ओळख, आत्मविश्वास वाढवून यशाची गुरुकिल्ली गाठण्याबाबत मार्गदर्शन केले. मुख्याध्यापक हनुमंत पवार यांनी प्रास्ताविक, महेंद्र भोसले यांनी सुत्रसंचलन केले तर रामप्रभू पेटकर यांनी आभार मानले. पांडुरंग जगताप, अजित पायगुडे, पंढरीनाथ पासलकर, शंकर वाल्हेकर, राजेंद्र जगताप यांसह विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

# युगेंद्र पवारांनी मतपडताळणीसाठी भरला अर्ज

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :-** बारामती विधानसभेसाठी अजित पवारांना विरोधात वातावरण असुनही मोठे मताधिक्य कसे घेतले, असा संशय शरद पवार गटाला असून युगेंद्र पवारांनी मत पडताळणीसाठी अर्ज दाखल केला आहे. विधानसभा मतदारसंघात अजित पवारांनी काका शरद पवार यांच्यावर मात केली आहे. लोकसभेला ताई, विधानसभेला दादा हे समीकरण बारामतीकरांनी यावेळीही पाळले आहे. शरद पवारांनी अजित पवारांचा सख्खा पुतण्या युगेंद्र पवार यांना उभे केले होते. परंतू, तिथे त्यांची डाळ शिजू शकली नाही.

बारामती विधानसभा निवडणुकीत युगेंद्र पवार यांचा मोठ्या मताधिक्याने पराभव झाल्यानंतर आता युगेंद्र पवारांनी गावोगावी जात मतदारांचे आभार मानायला सुरवात केली आहे. काटेवाडी गावातून या आभार दौऱ्याला त्यांनी सुरुवात केली आहे. ज्या लोकांनी आम्हाला साथ दिली आणि ज्यांनी साथ दिली नाही त्यांच्यापर्यंत आपण परत एकदा गेले पाहिजे आभार मानले पाहिजेत हीच शिकवण शरद पवार यांची आहे. त्यासाठी हा आभार दौरा करत असल्याचं युगेंद्र पवारांनी म्हटले आहे.

तसेच मतपडताळणी अर्जावर ते म्हणाले की, महाराष्ट्रात संशयाचे आणि संभ्रमाचे वातावरण आहे. राज्यातील अनेक दिग्गज कधीही न हरणारे नेते तिथे हरले आहेत. हे का झालं? सुप्रिम कोर्टाने आम्हाला हा अधिकार दिला आहे तर मग मत पडताळणी करायला काय हरकत आहे. अजित पवार म्हणतात की लोकसभेनंतर लोकांचा कल बदलला यावर बोलताना युगेंद्र यांनी म्हटले की लोकांचा खरोखरचाच कल असेल तर तो स्वीकारावा लागेल. पण नक्की ते का झाले? कशामुळे झाले? कुणामुळे झाले? याचा अभ्यास केला पाहिजे.





# विद्यार्थी वाहतूक बस धुताना शॉक लागून चालकाचा मृत्यू

### संस्था संचालकांसह कर्मचाऱ्यांवर गुन्हा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :-** विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या बसचालकाचा विजेच्या धक्क्याने मृत्यू झाल्याची घटना कोंढव्यातील सिंहगड सिटी स्कूलच्या आवारात घडली. दुर्घटनेस जबाबदार असल्याप्रकरणी संस्थेच्या संचालकांसह कर्मचाऱ्यांविरुद्ध कोंढवा पोलिसांकडून गुन्हा दाखल करण्यात आला. संतोष पांडुरंग माळवदकर (४७, रा. पिसोळी ग्रामपंचायतीसमोर, कोंढवा) असे मृत्युमुखी पडलेल्या बस चालकाचे नाव आहे. दुर्घटनेस जबाबदार असल्याप्रकरणी सिंहगड सिटी स्कूलचे संचालक धनंजय तुकाराम महाडिक, संस्थेतील वाहतूक पर्यवेक्षक दौलत दत्तात्रय ढोक, विजय संपत कुंभार यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत संतोष माळवदकर यांची पत्नी सुनीता (४०) यांनी कोंढवा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. संतोष माळवदकर सिंहगड सिटी स्कूलमधील विद्यार्थ्यांची वाहतूक करतात. १८ ऑक्टोबर रोजी ते सिंहगड सिटी स्कूलच्या आवारात लावलेली बस पाणी मारुन स्वच्छ करत होते. त्यावेळी बसमधील कॉम्प्रेसरमधील वायरमधून विजेचा धक्का माळवदकर यांना बसला. विजेच्या धक्का बसल्याने माळवदकर बेशुद्ध पडले. संस्थेतील कर्मचाऱ्यांनी त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल केले. उपचारांपूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी कोंढवा पोलिसांनी सुरुवातीला आकस्मित मृत्यू अशी नोंद केली होती. माळवदकर यांची पत्नी सुनीता यांनी नुकतीच पोलिसांकडे फिर्याद दिली. सदोष वायरमधून विजेचा धक्का बसून पतीचा मृत्यू झाला. बसची देखभाल न केल्याने दुर्घटना घडली. दुर्घटनेस संस्थेतील संचालक तसेच पर्यवेक्षक जबाबदार असल्याचे त्यांनी फिर्यादीत नमूद केले. सहायक पोलिस निरीक्षक राजेश उसगावकर पुढील तपास करत आहेत.



## प्रसाद महाराज अमळनेरकर दिंडीचे धामणीत उत्साहात स्वागत



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**लोणी धामणी प्रतिनिधी**

दरवर्षीप्रमाणे यंदाही सखाराम महाराज संस्थान अमळनेर (जिल्हा जळगांव) येथील ह.भ.प. प्रसाद महाराज अंमळनेकर (गोविंदबुवा) यांच्या पायी दिंडीचे रविवारी (दि. १) रोजी सकाळी धामणी (तालुका आंबेगांव) येथे आगमन झाले. टाळमृदुंगाच्या गजरात दिंडीचे स्वागत करण्यात आले. पायी दिंडी श्रीक्षेत्र केंदूर येथून पाबळ लोणी मार्गे पुरातन श्री खंडोबा देवस्थान मंदिरात आली. राम मंदिरात महापूजा व आरती झाल्यानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम संपन्न होऊन सायंकाळी अंमळनेरकर दिंडीचे पारगांव (शिंगवे) कडे प्रस्थान झाले. कुलस्वामी म्हाळसाकांत देवस्थान मंदिराच्या ''मार्तंड'' महाद्वाराच्या दोन्ही बाजूला ''जयविजय'' चे संगमरवरी शिल्प भिमाशंकर कारखान्याच्या संचालिका पुष्पलता वामनराव जाधव.प्रा उत्तमराव जाधव आणि बाळशिराम जाधव गुरुजी यांनी जयपूर (राजस्थान) येथून आणलेले असून त्या शिल्पाचे अनावरण प्रसाद महाराज अमळनेरकर यांच्या हस्ते मार्गशिर्ष शुध्द प्रतिपदा सोमवारी (२ डिंसेबर) सकाळी नऊ वाजता आयोजित देवस्थानचे सेवेकरी मंडळीनी सांगितले.

## शिक्रापूरच्या तलाठी सुशिला गायकवाड पुरस्काराने सन्मानित

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**तळेगाव ढमढेरे, प्रतिनिधी:** शिक्रापूर (ता. शिरुर) येथील तलाठी सुशिला गायकवाड यांना नुकतेच नालंदा ऑर्गनायजेशन संस्थेच्या वतीने ग्रामसमृद्धी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे

शिक्रापूर (ता. शिरुर) येथील तलाठी सुशिला गायकवाड यांनी पुणे जिल्ह्यातील विविध भागात कर्तव्य बजावत असताना शासनाच्या विविध योजनांचा लाभ शेतकऱ्यांना मिळवून देत भूसंपादन विभागाचे कार्य करत असताना मतदान केंद्राच्या परिसरात मतदारांना उल्लेखनीय सुविधा देण्याचे काम केले असून त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना नुकतेच नालंदा ऑर्गनायजेशन संस्थेच्या वतीने ग्रामसमृद्धी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे, तर सुशीला गायकवाड यांना ग्रामसमृद्धी पुरस्कार देण्यात आल्याने त्यांचे शिक्रापूर सह शिरुर तालुक्यातून कौतुक होत आहे.



शिक्रापूर (ता. शिरुर) येथील तलाठी सुशिला गायकवाड यांना सन्मानित करताना मान्यवर. **(छायाचित्र आकाश भोरडे)**

# लिंपणगाव ते नागवडे कारखाना रस्त्यासाठी अपुरा निधी का ?

## ३०० मीटर रस्ता दुरुस्तीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर !

## ग्रामस्थ, वाहन चालकांचा सवाल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लिंपणगाव** - लिंपणगाव ते सहकार महर्षी नागवडे कारखाना रेल्वे गेट या रस्त्याचे अंतर साधारणता १४५० मीटर असताना अकराशे मीटर या अर्धवट नादुरुस्त कामासाठी निधी उपलब्ध झाल्याने उर्वरित अडीचशे मीटर रस्ता पुन्हा दुरुस्तीच्या प्रतीक्षेत राहणार असून; सार्वजनिक बांधकाम विभागाने रेल्वे गेटलगत असणाऱ्या अडीच ते तीन फूट खड्ड्यांच्या दुरुस्तीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाला पुन्हा निधी उपलब्ध करावा लागेल; अशी स्थिती सध्या या महत्त्वाच्या रस्त्याच्या दुरुस्ती संदर्भात निर्माण झाल्याचे दिसून येत आहे.

दरम्यान लिंपणगाव ते नागवडे कारखाना रेल्वे गेट रस्त्याचे काम सध्या मुरमीकरणानंतर आता डांबरीकरण सुरू झाले आहे. परंतु सदर रस्ता लिंपणगावकडून नागवडे कारखाना रेल्वे गेट पर्यंत मंजुरी नसल्याने जवळपास हा रस्ता अडीचशे मीटर खड्डेमय बनलेला दुरुस्ती पासून वंचित राहणार असल्याचे संबंधित ठेकेदाराकडून समजले. सदर नादुरुस्त रस्त्याची आमच्या प्रतिनिधीने पाहणी केल्यानंतर हे बाब प्रकर्षाने लक्षात आली. यावेळी पाहणी दरम्यान सदर अडीचशे मीटर रस्ता अत्यंत खड्डेमय जवळपास तीन ते साडेतीन फूट खोल जागोजागी चौकोनी आकाराचे रस्त्याच्या मध्यभागी खड्डे पडल्याने अद्यापही या रस्त्यातून अपघात घडले जात आहेत. त्यामध्ये साखर कारखान्यांचे गाळप हंगाम सुरू झालेले असून सदर रस्ता वरदळीचा बनला गेला आहे. ऊस वाहतूकही या रस्त्यातून वाढली जात आहे. अशा परिस्थितीत अवजड वाहने या रस्त्यातून मार्गस्थ होताना अनेक वाहने या खड्ड्यांमध्ये जाऊन पलटी होताना दिसत आहेत. गाळप हंगामामध्ये हा रस्ता दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा समजला जातो. असे असताना संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाने सदर रस्ता लिंपणगाव ते नागवडे कारखाना रेल्वे गेट पर्यंत रस्ता दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता होती. परंतु फक्त या रस्त्यासाठी अकराशे मीटरची जवळपास

> या नादुरुस्त रस्त्याच्या प्रश्नसंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता श्री होके यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले की; लिंपणगाव ते नागवडे कारखाना रेल्वे गेट या रस्त्यासाठी फक्त ११०० मीटरसाठीच दीड कोटी रुपये उपलब्ध झालेले आहेत. उर्वरित अडीचशे मीटर रस्त्यासाठी पुन्हा वेगळा प्रस्ताव तयार करावा लागेल असे सांगितले.



दीड कोटीची मंजुरी असल्याचे समजते. त्यामुळे अडीचशे मीटर खड्डेमय रस्ता पुन्हा दुरुस्तीच्या प्रतीक्षेत असून; संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी निधी उपलब्ध होईल तेव्हा होईल. परंतु चालू रस्ता दुरुस्तीच्या कामातून संबंधित ठेकेदाराकडून किमान अडीच ते तीन फूट खोल खड्डे खडी व डांबर टाकून दुरुस्तीसाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता असल्याचे सभासद; कामगार व वाहतूकदार यांनी केली आहे. दरम्यान सध्या रस्त्याचे मुरमीकरण करून त्यावर खडी व डांबरीकरण सुरू आहे. परंतु सदर रस्ता हा दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असून; दीड कोटी रुपये हा मोठा निधी या रस्त्यासाठी उपलब्ध असताना अडीचशे मीटर नादुरुस्त रस्ता कोणत्या कारणासाठी दुर्लक्षित ठेवला? असा सवाल देखील ग्रामस्थ व वाहन चालकांमधून उपस्थित केला जात आहे. त्याबरोबरच चालू असलेल्या रस्त्याचे काम अधिक दर्जेदार व्हावे; यासाठी संबंधित बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी वेळोवेळी लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

द·ख·ल

# आ. हेमंत ओगले यांचे पेडगाव येथे जंगी स्वागत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा** :- मूळचे श्रीगोंदा तालुक्यातील पेडगाव येथील रहिवासी हेमंत ओगले हे श्रीरामपूरविधानसभा मतदार संघात भरघोस मताधिक्य घेऊन निवडून आल्याने गावकऱ्यांच्या वतीने जंगी स्वागत करण्यात आले

मूळचे श्रीगोंदा तालुक्यातील पेडगाव येथील रहिवासी हेमंत भुजगराव ओगले हे अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीरामपूर विधानसभा निवडणुकीमध्ये

अटीतटीच्या लढतीमध्ये बाजी मारली. त्यांच्या गळ्यामध्ये श्रीरामपूर तालुक्याने विजयाची माळ घातली. ते विजयी होताच पहिल्यांदा त्याच्या मुळ गावी श्रीगोंदा तालुक्यामध्ये पेडगाव या ठिकाणी येताच फटाक्यांची आणि डीजे वाजवत स्वागतासह विजयोत्स साजरा करण्यात आला. पेडगाव मध्ये जंगी मिरवणूक काढण्यात आली. पेडगाव येथे कार्यकर्त्यांनी स्वागताची जय्यत तयारी करत जंगी स्वागत केले. आमदार हेमंत ओगले याचे आगमन होताच ढोल ताश्याच्या गजरात फटाक्यांची आतषबाजी तसेच जेसीबी पुष्प उधळण करत जंगी स्वागत करण्यात आले त्यानंतर सर्वांना स्नेहभोजन ठेवण्यात आले होते.

# कामगार ऊस तोडणीला गेल्याने खर्ड्याची बाजारपेठ थंडावली

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**खर्डा:** परिसरातील ऊस तोड कामगार ,असंख्य शेतमजूर हे ऊस तोड कामगार म्हणून साखर कारखाना परिसरात स्थलांतरी सहा महिन्यांसाठी होतात. बैलगाडी किंवा ट्रॅक्टरच्या ट्रालीत आपला प्रपंच भरतात व मुले,बाळे पत्नी सहीत ट्रॅक्टर वर बसून स्थलांतर करतात कारखाना परिसरात ही ज्या भागात ऊस आहे अशा ठिकाणी राहूट्या करुन राहतात,त्यामुळे खर्डा परिसरात व्यापार पेठ थंडावली.

जामखेड तालुक्यातील खर्डा परिसरात कसलेही औद्योगिकीकरण नाही ,हाजारो कामगारांना कामधंदा नाही यामुळे हा परिसर मागास म्हणून प्रसिद्ध आहे डोंगर जास्त परिसर शेती आहे, ती कोरडवाहू व बाकी आहे. कायम शेती साठी मोठा तलाव नाही आहे त्या शेतीत खरीप हंगामात सोयाबीन,तूर,मुग उडीद,मका अशा पिकांचे उत्पादन घेतात रब्बी हंगामात ज्वारी, गहू, हरभरा सारखे उत्पादन घेतात. सोयाबीन ,तूर, मुग, उडीद ,मका या पिके उत्पादन हे दैनंदिन जीवनात खर्च करण्यासाठी या पैसे चा वापर करतात. तर ज्वारी, बाजरी ,गहू, हरभरा ही घरी खाण्यासाठी धान्य साठवण करतात. जोड धंदा म्हणून दुधाचा करतात दोन तिन संकरीत गाया पाळतात या मुळे कामगारांना कामधंदा करून ही आर्थिक अडचणी येतात. या मुळे असंख्य शेतमजूर हे ऊस तोड कामगार म्हणून साखर कारखाना परिसरात स्थलांतरीत सहा महिन्यांसाठी होतात.

त्यांची मुले, मुली शिक्षणापासून वंचित राहातात व याचमुळे शेतमजूर चा मुलगाही पुढे ऊसतोड कामगार म्हणूनच काम करतौ ,खर्डा परिसरातील अनेक लहान मोठे गावे,वाड्या ,वस्त्या ओस पडल्या आहेत म्हणून तर खर्डा बाजार पेठ पुर्ण थंडावली आहे. कसलीही आर्थिक उलाढाल होत नाही त्यामुळे व्यापार पेठेतील व्यापारी अडचणीत आला आहे.

# अर्धवट रस्त्यामुळे विद्यार्थ्यांची अडचण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**करंजी:** करंजी ते भोसे रस्त्यावर रस्त्याचं अर्धवट काम झाल्यामुळे रस्त्यावरून ये जा करताना पायी चालणाऱ्या पादचाऱ्यांसह वाहन चालकांची ही मोठी अडचण होत आहे.हा रस्ता तातडीने करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

करंजी ते भोसे असे तीन किलोमीटर अंतराचे काम गेल्या तीन महिन्यापासून ठेकेदार करत आहे. हे काम अत्यंत संथ गतीने सुरू आहे. भोसे ते श्री नवनाथ विद्यालय पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करताना साईड पट्ट्या खोदून त्या दुरुस्त केल्या मात्र त्यावर अद्यापही डांबरीकरण करण्यात आलेले नाही.अकोलकर हॉस्पिटल जवळील वळणाचा रस्ता सिमेंट कॉंक्रेट ने एकाच बाजूने केला आहे त्यावरूनही जाण्या येण्याची सोय नाही तसेच राहिलेल्या अर्ध्या बाजूलाही मुरूम टाकून काहीही सोय केलेली नाही. त्यामुळे वाहन चालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. पादचाऱ्यांनाही तिसऱ्याच बाजूने येजा करावी असल्यामुळे त्यांची मोठ्या प्रमाणात अडचण झाली आहे. खऱ्या अर्थाने या ठिकाणी मोठा पूल होणे गरजेचे होते मात्र सार्वजनिक बांधकाम विभागाने याकडे दुर्लक्ष देत फक्त तो भाग सिमेंट कॉंक्रीट चा करून उचलून घेण्यात आला आहे. त्यामुळे भविष्यातही इथल्या एका बाजूला मोठ्या प्रमाणामध्ये पाणी साचून अडचण निर्माण होणार आहे. मात्र सध्या तरी या अर्धवट कामामुळे नागरिकांची मोठी पंचायत होत आहे त्यामुळे शाळेकडे जाणारे विद्यार्थ्यांसह भोसे गावातील ग्रामस्थांनीही या वळणावरील रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करण्याची मागणी केली आहे.

शाळेकडे जाणारा रस्ता अर्धवट असल्यामुळे विद्यार्थ्यांची मोठी अडचण होत आहे त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने याकडे लक्ष देऊन तातडीने हा रस्ता करण्यासाठी ठेकेदाराला सांगावे अशी मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या सामाजिक न्याय विभागाचे सतीश क्षेत्र यांनी केली आहे.

# मिरजगाव येथे आ.रोहित पवार यांचे फटाके फोडून स्वागत



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मिरजगाव :** विधानसभा निवडणुकीत कर्जत जामखेड मतदारसंघामधून आमदार पदी निवड झालेले आ.रोहित पवार यांचा शनिवार दि.३० रोजी मिरजगाव येथे महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

निवडणुकीत विजयी झाल्यानंतर पहिल्यांदाच नवनिर्वाचित आ. रोहित पवार कर्जत तालुक्यातील मिरजगाव येथे क्रांती चौकात आले असता, येथील कार्यकर्त्यांच्या वतीने फटाके वाजवून त्यांचे स्वागत करण्यात आले. तसेच यावेळी ग्रामस्थांच्या वतीने शाल श्रीफळ व पुष्पहार देऊन आ.पवार यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी गुलाब तनपुरे, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष डॉ.चंद्रकांत कोरडे, सावता परिषदेचे कर्जत तालुकाध्यक्ष डॉ. पंढरीनाथ गोरे, मिरजगाव खरेदी विक्री संघाचे चेअरमन प्रकाश चेडे, संजय पवार, अमोल माने, तानाजी पिसे, अंकुश म्हेत्रे, अविनाश घोडके, अजय लिंगडे, मुदसर शेख, सागर पवळ, सलिम आतार, सोनू बागवान, ग्रामपंचायत सदस्या डॉ.रजनी कोरडे, डॉ.शुभांगी गोरे, श्रद्धा तनपुरे, सरस्वती घोडके, उज्वला घोडके, लता कवळे आदींसह राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी - शरदचंद्र पवार पक्ष, शिवसेना (उ.बा.ठा.), राष्ट्रीय कॉंग्रेस पार्टी व मित्र पक्ष, मिरजगांव शहर व परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते..

**********

# करंजीत चंपाषष्ठीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**करंजी :** येथे शनीवार दि. ७ डिसेंबर रोजी खंडोबा मंदिर नगर रोडवर असलेल्या खंडोबा मंदिर येथे चंपाषष्ठी निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती संयोजक भाऊ वायरमन अकोलकर यांनी दिली आहे.

दरवर्षीप्रमाणे चंपाष्टमीनिमित्त करंजी येथील खंडोबा मंदिरामध्ये विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. यावर्षी देखील संयोजक मंडळीच्या वतीने वाघे मुरळी यांचा जागरण गोंधळ, महाप्रसाद असे विविध कार्यक्रम आयोजित केले आहेत. करंजी ग्रामस्थांकडून या संपूर्ण खंडोबा मंदिर परिसराचे सुशोभीकरण करण्यात आले आहे.या ठिकाणी सोमवती अमावस्या व चंपाष्टमी कार्यक्रम मोठ्या भक्तिमय वातावरणामध्ये आयोजित केले जातात. यावर्षी आयोजित करण्यात येणाऱ्या धार्मिक कार्यक्रमाचा करंजीसह परिसरातील

भक्तांनी लाभ घ्यावा, असे आवाहन भाऊसाहेब रावसाहेब अकोलकर, अनिल अकोलकर, बबन टकले, किसन अकोलकर, वाघे संभाजी भाकरे, सचिन अकोलकर, मच्छिंद्र अकोलकर, गणेश भाकरे, लाला खोसे,रवींद्र शिंदे, जय भोले अॅक्वाचे प्रदिप अकोलकर, पंढरीनाथ पवार, आचारी बाळासाहेब सोनाजी अकोलकर, शेखर मोरे, विकास अकोलकर, यांनी केले आहे.



# नवरी पसंत आहे,पण नवरदेवाला हुंडा पाहिजे

## आ. रोहित पवारांचा महायुतीला टोला.

**पाथर्डी:** विधानसभा निवडणुकीत महायुती सरकारला स्पष्ट बहुमत मिळून आठ दिवस उलटून गेले असून तरी देखील सरकार स्थापन झालेले नाही.त्यानंतर काल शनिवारी भाजपने शपथविधीचा तारीख जाहीर केली.मात्र,तरीही सत्तावाटपातील मुख्यमंत्री शिंदे यांची नाराजी दूर झाली नसल्याची चर्चा आहे.यावरून रोहित पवार यांनी महायुतीला लक्ष्य केलं आहे. नवरी पसंत आहे.पण नवरदेवाला हुंडा पाहिजे,अशा शब्दात शरद पवार गटाचे आ. रोहित पवार यांनी महायुतीला अप्रत्यक्ष टोला लगावला आहे. शेवगाव-पाथर्डी मतदारसंघातील शरद पवार पक्षाचे पराभूत उमेदवार अॅड.प्रताप ढाकणे यांनी शहरातील वीर सावरकर मैदान येथे जाहीर आभार मेळाव्याचे आयोजन केले होते.या मेळाव्याला राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार,अॅड. प्रताप ढाकणे,खासदार निलेश लंके यांच्या पत्नी राणी लंके,तालुकाध्यक्ष शिवशंकर राजळे,कॉंग्रेसचे नासीर शेख,राजू दौंड,महिला जिल्हाध्यक्ष योगिता राजळे,सविता भापकर,बंडू पाटील बोरुडे,वैभव दहिफळे,आपचे सुभाष केकान,सीताराम बोरुडे,देवा पवार,योगेश रासने,माऊली केळगंद्रे,रामराव चव्हाण,किसन आव्हाड,अजित मेहेर,सचिन नागापुरे यासह शेवगाव-पाथर्डीतील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमात आमदार रोहित पवार यांनी सत्ता स्थापनेला होणाऱ्या विलंबावरून महायुतीला टोला लगावला आहे.भाजपने शपथविधीची तारीख जाहीर केली आहे.मात्र,मुख्यमंत्री कोण होणार,हा प्रश्न गुलदस्त्यात आहे.याबाबत बोलताना रोहित पवारांनी महायुतीवर टीका केली.यावेळी बोलताना रोहित पवार म्हणाले की,२६ तारखेला सर्व पार पा डायचं होतं.त्यानंतर २९ तारीख आली. पुढे २ तारीख आली. आता ५ तारीख फायनल झाली आहे.आता हे म्हणजे असं झालं आहे.नवरदेवाला नवरी पसंत आहे. लग्न ठरलं आहे.पण लग्नाची तारीख आली. आता नवरदेव रुसून बसला आहे की,मला हुंडा पाहिजे म्हणजेच मला पद पाहिजे,अशी महायुतीची अवस्था झाली आहे.मुख्यमंत्री पदावरुन त्यांचे भांडण सुरू असल्याची टीका आमदार रोहित पवार यांनी केली आहे.



छाया -राजेंद्र भंडारी

# ताप सर्दी, खोकल्याच्या रुग्णांत वाढ;

## राशिन परिसरात थंडीचा कडाका



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राशीन:** यावर्षी सप्टेंबर महिन्याच्या अखेरपर्यंत जोरदार पर्जन्यवृष्टी झाली. त्यामुळे वातावरणात ऑक्टोबर महिन्यापासून कडाक्याच्या थंडीला सुरुवात झाली. हिवाळ्यात यंदा वातावरणात सतत बदल झाल्याने थंडीचा कडाका वाढला आहे. त्यामुळे सर्दी, कोरडा खोकला, ताप, घशातील खवखव यामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. हवेतील थंड गारटा. धूळ, मातीचे कण, आहारातील बदल अशा अनेक कारणामुळे आरोग्याच्या समस्या सातत्याने उदभवत आहेत. यामध्ये प्रामुख्याने सर्दी,खोकल,ताप अशा त्रासांचा समावेश आहे. यंदा कोरड्या खोकल्याची समस्या प्रामुख्याने मोठ्या प्रमाणात पहायला मिळत आहे. त्यामुळे रुग्ण हैराण झाले आहेत. तात्पुरता औषधोपचार आणि घरगुती उपाययोजनांन दोन-चार दिवसांत खोकला बरा होत असायचा.मात्र, सध्या आठ ते दहा दिवस उलटूनही सर्दी,खोकल्याने नागरिक त्रस्त असल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणात वाढले आहेत.

हिवाळा आरोग्यासाठी लाभ कारक मानला जातो.मात्र, हिवाळ्याच्या दिवसांत दम्याच्या रुग्णासाठी एक प्रकारे आव्हानच असते.थंड वारे, कोरड्या हवेमुळे श्वासनलिकेमध्ये परिणाम होतो. थंडी वाढू लागते. त्यामुळे वातावरणातील दमटपणा आणि संसर्गात वाढ होते. त्याचबरोबर छातीतील इन्फेक्शन कफ आणि फ्लूचा प्रादूर्भाव होण्याची शक्यता देखील बळावते.

**- डॉ. तोसिफ सय्यद,राशिन**

==============================

# ज्येष्ठ कलाकारांकडून नवोदितांनी शिकले पाहिजे : वाघमारे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राशीन :** मला खूप काही समजतं या अविर्भावात राहू नये. चांगल्या कलाकाराचे समाधान कधीच होत नाही. यापेक्षा अधिक काय चांगले करता येईल याकडे त्याचा कल असतो.म्हणूनच ते कलावंत मोठे असतात. कलावंताने आपली कला पुढील पिढीकडे हस्तांतरित करीत राहावे. ज्येष्ठ कलाकारांकडून नवोदिताने शिकत रहावे.असे आवाहन शाहीर पठ्ठे बापूराव प्रतिष्ठानचे संस्थापक जयप्रकाश वाघमारे यांनी केले.

कला परिवार या संस्थेच्या सातव्या वर्धापन दिनानिमित्त पुणे शहरातील महात्मा फुले सांस्कृतिक भवन येथे पुरस्कार वितरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.या वेळी पठ्ठे बापूराव प्रतिष्ठानचे संस्थापक जयप्रकाश वाघमारे ( गुरव) यांना कला परिवार जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.या पुरस्काराचे वितरण निवृत्त शिक्षक आनंदराव साळुंखे व ज्येष्ठ छायाचित्रकार व मूर्तिकार अब्दुल सय्यद यांच्या शुभहस्ते देण्यात आला.. तसेच कला परिवार चे संस्थापक सदस्य गणेश कदम पुरस्कार स्मृती पुरस्कार व हसीना मंडल यांच्या नावे देण्यात येणारा पुरस्कार अनुक्रमे अमर पुणेकर व रेखा मेमाणे यांना प्रदान करण्यात आला. पुरस्कार स्वरूप स्मृतीचिन्ह मानपत्र शाल व श्रीफळ देऊन पुरस्कारार्थी यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी नगरसेवक मारुती आबा तुपे, पंचायत समिती सदस्य हेमलता बडेकर , डॉ. शंतनू जगदाळे,दत्ता दळवी, महेश ससाणे, राजकुमार माने, कला परिवाराचे अध्यक्ष दिलीप मोरे,सामाजिक कार्यकर्त्या हेमा लाळगे आदी मान्यवर उपस्थित होते.



जयप्रकाश वाघमारे यांनी राशीन येथील जगदंबा देवी चरित्र व पठ्ठे बापूराव गौरवांक हे साहित्य प्रकाशित केले आहे. पठ्ठे बापूराव प्रतिष्ठानच्या वतीने गेले २५ वर्ष लावणी महोत्सव व पठ्ठे बापूराव पुरस्कार या माध्यमातून अनेक कलावंतांना व्यासपीठ मिळवून दिले आहे. सामाजिक कार्यात सुद्धा ते अग्रेसर असतात. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अध्यक्ष दिलीप मोरे यांनी, आभार हेमा लाळगे यांनी, सूत्रसंचालन देवयानी मोरे यांनी केले.

*******

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री



## पाथर्डीत ईव्हीएमची होळी करत निषेध

### जिल्ह्यातील ईव्हीएम विरोधातील आंदोलनाला सुरुवात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी** : महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत भाजप,शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी अजित पवार गट यांच्या महायुतीला स्पष्ट बहुमत मिळाले तरी लोकसभेच्या तुलनेत महाविकास आघाडीला मोठा फटका विधानसभेमध्ये बसला आहे.हा फटका ईव्हीएममुळे बसल्याचा आरोप महाविकास आघाडीतून केला जात आहे.ईव्हीएमच्या विरोधात महाविकासआघाडी आक्रमक झाली असून शेवगाव-पाथर्डी विधानसभा मतदारसंघात याची पहिली ठिणगी पडली आहे.राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार व अँड.प्रताप ढाकणे यांच्या नेतृत्वाखाली येथील तहसील कार्यालयाच्या आवारात ईव्हीएम मशीनची प्रतिकात्मक होळी करून ईव्हीएम विरोधात राज्यातील पहिले आंदोलन करण्यात आले आहे.

आ. रोहीत पवार यांनी पाथर्डीमध्ये ड.प्रताप ढाकणे यांनी आयोजित केलेल्या आभार मेळाव्याला उपस्थित



(छाया - राजेंद्र भंडारी)

राहून नागरिकांशी संवाद साधला आणि येणाऱ्या निवडणुकीत जनमताचं प्रतिबिंब निकालात उतरवायचं असेल तर अधिक जागरुक राहण्याची आवश्यकता व्यक्त केली.शेवगाव-पाथर्डीच नाही तर एकूणच राज्यातील विधानसभेच्या निकालाबाबत मतदारांमध्ये अनेक शंका आहेत.त्यामुळं महायुतीला मिळालेला हा विजय जनतेचा कौल नाही तर ईव्हीएमच्या माध्यमातून चोरलेला निकाल असल्याची लोकभावना आहे.त्यामुळेच पाथर्डी तहसील कार्यालयासमोर प्रतिकात्मक ईव्हीएम मशीनची होळी करत बोंबाबोंब आंदोलन केले.यावेळी तालुकाध्यक्ष शिवशंकर राजळे,हरिश भारदे,राणी लंके,काँग्रेसचे नासिरभाई शेख,बंडू पाटील बोरुडे,योगिता राजळे,सिताराम बोरुडे यांच्यासह महाविकास आघाडीतील पक्षांचे स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.महाविकास आघाडीने ईव्हीएमविरोधात एल्गार पुकारलेला आहे. जनमताचा कौल ईव्हीएमविरोधात असून त्यांनी दिलेल्या मतांचे प्रतिबंब निकालात उमटलेले नाही,असे विरोधी पक्षाचे म्हणणे आहे.शिवसेना,राष्ट्रवादी आणि काँग्रेसने ईव्हीएमविरोधात आक्रमक पवित्रा घेतलेला आहे. ईव्हीएम लोकांना नको असेल तर सत्ताधाऱ्यांची बळजबरी कशाला करावी असा सवाल ते विचारत आहेत.मविआच्या अनेक उमेदवारांनी फेरमतमोजणीसाठी आयोगाकडे पैसे भरले आहेत.अनेक मतदारसंघातले निकाल धक्कादायक असल्याची तक्रार घेवून राष्ट्रवादीचे उमेदवार शरद पवार यांच्याकडे गेल्यानंतर पवार यांनी वकिलांची टीम फौज तयार केली आहे तर कुणीही मागे हटू नका असे सांगत ठाकरे गट आणि काँग्रेसनेही ईव्हीएमच्या विश्वासर्हतेवर बोट ठेवले असल्याचे रोहीत पवार यांनी सांगितले.मेळावा संपल्यानंतर हजारोंच्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी वीर सावरकर मैदान ते तहसील कार्यालय येथे पायी जात ईव्हीएम मशीन ची प्रतिकात्मक होळी करत बोंबाबोंब आंदोलन करून निषेध व्यक्त केला.

## कत्तीचा धाक दाखवून लुटणारे जेरबंद

### ८ लाख ११ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : दि. २८ नोव्हेंबर रोजी राहता तालुक्यातील नांदूर येथील अद्रक व्यापाराच्या मुकादमास कत्तीचा धाक दाखवून मजुरांच्या पगारासाठीचे ५ लाख १८ हजार रुपये अज्ञात चोरट्यांनी चोरून नेले होते. यातील सहा आरोपींना गुन्ह्यात वापरलेल्या गाडी मोबाईल व रोख रक्कम अशा ८ लाख ११ हजार रुपयांच्या मुद्देमालासह स्थानिक गुन्हे शाखेने जेरबंद केले आहे.

याबाबत माहिती अशी की, फिर्यादी डावर हे दर महिन्याला मार्केटयार्ड श्रीरामपूर येथील व्यापाऱ्याकडून ५ ते ६ लाख रूपये मजुरांना पेमेंट करण्यासाठी मोटार सायकलवरून बॅगमध्ये घेऊन जात असल्याची माहिती आरोपींना होती.इम्रान आयुब शहा व सुरज सोपान मुठे यांना पैशाची गरज असल्याने त्यांनी ऋषीकेश किशोर पागीरे याचे मदतीने फिर्यादीस लुटण्याचा कट केला. फिर्यादी हा मार्केट यार्ड, श्रीरामपूर येथून पैस घेऊन निघाल्याची माहिती ऋषीकेश किशोर पागीरे याने इम्रान आयुब शेख व सुरज सोपान मुठे यांना दिली. सुरज मुठे याने फिर्यादी पल्सर मोटार सायकलवरून जात असताना त्याचा पाठलाग करून, इम्रान आयुब शेख यास फिर्यादी दारासिंग डावर दाखवून दिला.

डावर यांना नांदुर भागात अज्ञात आरोपीतांनी स्विफ्ट कारने मोटार सायकलला धडक दिली व कोयत्याचा धाक दाखवून ५लाख १८हजार रूपये हिसकावून नेले. गुन्ह्याचे गांभीर्य पाहता.राकेश ओला, पोलीस अधिक्षक यांनी पोनि .दिनेश आहेर, स्थानिक गुन्हे शाखा यांना गुन्हे उघडकीस आणणेबाबत विशेष पथक नेमुन कारवाई करणे बाबत आदेश दिले होते. आदेशा प्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक दिनेश आहेर यांनी तपास पथकातील पोलीस अंमलदार मनोहर गोसावी, गणेश भिंगारदे, अतुल लोटके, फुरकान शेख, अमृत आढाव, मेघराज कोल्हे, रमिजराजा आत्तार व अरूण मोरे अशांचे पथक नेमुण गुन्ह्यातील आरोपींचा शोध



घेणेबाबत सुचना दिल्या. तांत्रीक विश्लेषणाच्या आधारे आरोपीचा शोध घेत असताना तपास पथकास गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, गुन्हा हा आरोपी इम्रान आयुब शहा, रा.वॉर्ड नं.१, श्रीरामपूर याने त्याचे साथीदारासह केला असून गुन्हा करतेवेळी वापरलेल्या गाडीसह स्विफ्ट डिझायर गाडी क्र.एमएच-२०-सीसी-९५०० मधुन गणेशनगर येथून वाकडी रोडने श्रीरामपूरकडे येणार असलेबाबत खात्रीशीर माहिती मिळाली. तपास पथकातील पोलीस अंमलदार यांनी तात्काळ वाकडी येथे सापळा रचुन संशयीत स्विफ्ट कार थांबवून ५ संशयीत इसमांना ताब्यात घेत असताना एक संशयीत इसम पळून गेला.उर्वरीत ४ संशयीत इसमांना ताब्यात घेतले. ताब्यातील इसमास त्याचे नाव गांव विचारले असता त्याने त्याचे १) नाव इम्राण आयुब शहा, वय २८, रा.आशीर्वादनगर, वॉर्ड नं.१, श्रीरामपूर, २) आनंद अमर पवार, वय २१, रा.दत्तनगर, श्रीरामपूर, ३) शादाब अब्बास शेख, वय २१, रा.दत्तनगर, श्रीरामपूर, ४) रितेश बाबासाहेब आढाव, वय १९, रा.दत्तनगर, श्रीरामपूर, असे असल्याचे सांगितले. पळून गेलेल्या साथीदाराचे नाव ५) अमीत पठारे, रा.बेथेल चर्चजवळ, सुतगिरणी, श्रीरामपूर, असे असल्याचे सांगीतले. तपास पथकाने पंचासमक्ष आरोपीची अंगझडती घेतली असता आरोपीतांकडून ३ लाख रूपये रोख रक्कम, ६०हजार रू किंमतीचे ४ मोबाईल,४लाख ५० रू किं.पांढरे रंगाची स्विफ्ट क्रमांक एमएच-२०-सीसी-९५०० व १ हजार रू किं. एक लोखंडी कत्ती असा एकुण८लाख ११ हजार रूपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

## नायलॉन मांजाने तरुणाचा गळा चिरला

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : पतंग उडवण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या नायलॉन मांजावर बंदी असतानाही सर्रासपणे त्याची विक्री होत असल्याचे उघड झाले आहे. चंदनापुरी येथील युवक दुचाकीवरुन घरी जात असताना या मांजाने त्याचा गळा व हाताची बोटे चिरल्याचा प्रकार घडला आहे. यामुळे प्रशासनाने सतर्क होवून नायलॉन मांजा विक्रेत्यांवर कडक कारवाईची मागणी होत आहे. राज्यात घातक असलेल्या नायलॉन मांजाला बंदी आहे. या मांजामुळे अनेकांचा मृत्यू झाल्याच्या घटना घडलेल्या आहेत. तरी देखील छुप्या पद्धतीने अनेक विक्रेते या मांजाची विक्री करत असल्याचे समोर येत आहे. नवीन वर्षाच्या आगमनापूर्वीच अनेक मुले व तरुण पतंग उडवत आहे. निलेश रहाणे असे जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे.अनेकजण नायलॉन मांजा वापरत असल्याने तो अनेकांच्या जीवावर बेतत आहे. चंदनापुरी येथील निलेश रहाणे हा तरुण आपल्या दुचाकीवरुन सायंकाळच्या वेळी घरी चालला होता. दरम्यान, जोर्वे नाका ते अमरधाम परिसरात अचानक नायलॉन मांजाने गळ्याला विळखा घातला. हा विळखा काढत असताना गळ्याबरोबर हाताची दोन बोटे चिरली असून दहा टाके टाके पडले आहेत. मोठा अनर्थ घडण्यापूर्वीच प्रशासनाने सतर्क होवून शहरातील मांजा विक्रेत्यांची झडती घेऊन कडक कारवाई करण्याची मागणी जोर धरु लागली आहे. याबाबतचे निवेदन स्वतः जखमी निलेश रहाणे यांनी मुख्याधिकारी रामदास कोकरे यांना दिले आहे.

## अवैध दारु विक्रेत्यावर छापा; देशी-विदेशी दारू जप्त

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अकोले**: तालुक्यातील कोंभाळणे येथे अवैधरित्या दारु विक्रेत्यावर अकोले पोलिसांच्या पथकाने गुरुवारी (दि.२८) सकाळी अकरा वाजेच्या सुमारास छापा टाकून देशी-विदेशी दारुसह ५५ हजार ५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. कोंभाळणे येथे अवैध दारु विक्री सुरू असल्याची माहिती पोलीस निरीक्षक मोहन बोरसे यांना समजली होती. त्यानुसार त्यांनी आपल्या पथकाला कारवाईच्या सूचना दिल्या. त्यानुसार पथकाने छापा टाकून ५५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. संतू हनुमंत सदगीर (वय ५९) हा दारु विक्री करताना मिळून आला. त्याच्याकडून ५३ हजार ६९० रुपयांची देशी दारु आणि १३६० रुपयांची विदेशी दारु असा एकूण ५५ हजार ५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी पोलिस कॉन्स्टेबल प्रदीप बढे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन संतू सदगीर याच्यावर विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलिस हेडकॉन्स्टेबल खाडे करत आहे.

## अवैध दारू वाहतूक करणाऱ्या वाहनावर पोलिसांची कारवाई

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : शहर व परिसरात अवैध व्यवसाय रोखण्यासाठी शिर्डी पोलीसांनी जिल्हा पोलीस प्रमुख राकेश ओला, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपविभागीय अधिकारी शिरीष वमने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक रामकृष्ण कुंभार यांनी विविध कारवाया गेल्या काही दिवसापासून सुरू केल्या आहेत. त्या अनुषंगाने अवैध पध्दतीने दारु वाहतूक करत असलेल्या वाहनावरदेखील बारकाईने लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. ३० नोव्हेंबरला सावळीविहीर परीसरात एका चार चाकी वाहनातून विना परवानगी दारू विक्री होत असल्याची माहिती मिळताच कुंभार, सहायय्क पोलिस निरीक्षक भारत बलैया, पोलीस नाईक गजानन गायकवाड, पोलीस कर्मचारी डि. व्ही. पवार, एस. के. दातीर, बाबासाहेब खेडकर, गणेश घुले, सोमेश गरदास, आनिल उजागरे यांनी शिताफीने सावळीविहीर खुर्द शिवारात रात्री सापळा लावला. एका चार चाकी वाहनास थांबण्यासाठी इशारा केला असता चालक गाडी सोडून पळून गेला. स्विफ्ट डिझायर (एम. एच. ०२, बी. टी. ३०९९) या वाहनाची तपासणी केली असता त्यात वेगवेगळ्या कंपनीच्या १८० दारुच्या ६५ हजार ५२० रूपये किमतीच्या दारु बाटल्या व ४ लाख ५०हजार रुपये किमतीचे वाहन असा एकूण ५लाख १५ हजार ५२० रुपये रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त ठेवलेकरण्यात आला आहे.

या कारवाईमुळे अवैध पध्दतीने हॉटेल, धांबे यांना विक्रीसाठी चारचाकी वाहनातून पोहच करणाऱ्या दारु विक्रेत्यांमध्ये खळबळ उडाली आहे. रात्रीच्या वेळी मद्य प्राशन करून वाहनचालक भरधाव वेगाने वाहतुकीकडे दुर्लक्ष करून वाहन चालवताना अपघात झाले होते. त्या अनुषंगाने हि मोहीम सुरू करण्यात आली असून अज्ञात चालकाच्या विरोधात शिर्डी पोलीस स्टेशनमध्ये पोलीस नाईक गजानन गायकवाड यांच्या फिर्यादी वरुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## संगमनेर टॅंकरमुक्त करणार : आ. खताळ

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर** : इकडे येऊन दहशतीवर खोटी भाषणे करणाऱ्यांना संगमनेरच्या जनतेन घरी बसवून तालुका भयमुक्त करून दाखवला आता तालुका टॅंकरमुक्त करून दाखवायचा असल्याचे प्रतिपादन आ. अमोल खताळ यांनी केले.

आ. खताळ यांनी सपत्नीक साईसमाधीचे दर्शन घेतले. महायुतीच्यावतीने त्यांच्या सत्कार करण्यात आला. माध्यमांशी बोलताना आ. खताळ यांनी पुन्हा बाळासाहेब थोरात यांच्या कार्यकर्त्यांनी निर्माण केलेल्या दहशतीवर टीका केली. त्यांच्या कार्यकर्त्यांकडून तालुक्यात अनेक वर्ष दहशत निर्माण केली जात होती. निवडणुकीत तालुका दहशतमुक्त करण्याचा आणि परीवर्तन करण्याचा नारा दिला होता. त्यास संगमनेर तालुक्यातील जनतेन साथ देत परीवर्तन करण्याचा निर्धार कृतीत उतरवला असल्याचे आ. खताळ म्हणाले.त्यांची चाळीस वर्षे फक्त दहशत निर्माण करण्यात गेली. पण ते जनतेला पाणी देऊ शकले नाही.आजही




तळेगाव, निमोण, साकूर, पठार भाग तहानलेला आहे. निळवंडेचे पाणीसुध्दा ना. राधाकृष्ण विखे यांच्या प्रयत्नामुळे मिळू शकले, असेही त्यांनी सांगितले. तालुक्यातील जनतेला पाणी द्यायचे हाच आपला प्रयत्न असून भयमुक्त तालुका करतानाच टॅंकरमुक्त तालुका करण्याचा आपला प्रयत्न असेल. वर्षानुवर्ष महिलांच्या डोक्यावरील हंडा उतरवण्याचा संकल्प आपला असून युवकांना रोजगार निर्माण करून देणे आणि आरोग्याच्या सुविधा भक्कम करण्याला प्राधान्य देणार असल्याचे ते म्हणाले. संगमनेरच्या जनतेची सेवा करण्यासाठी साईबाबांनी शक्ती द्यावी, अशी प्रार्थना आपण केली असून तालुक्यातील मायबाप जनतेन भरभरून मतदान करून विधानसभेत पाठवले आहे. त्यांच्या अपेक्षा पूर्ण करणे हेच आपले कर्तव्य असल्याचे आ.खताळ यांनी सांगितले.याप्रसंगी भाजपा जिल्हा उपाध्यक्ष अशोक पवार, युवा मोर्चाचे उपाध्यक्ष किरण बोराडे, जिल्हाध्यक्ष योगेश गोंदकर, नवनाथ मंजमुळे, शहराचे अध्यक्ष विकास गोंदकर, संगमनेरचे अध्यक्ष शशांक नामन, सुयोग गोंदकर, राजेंद्र बलसाने, प्रसाद शेलार, योगेश बडे, राहूल घुले, महेश सुपेकर, रोहीदास गुंजाळ उपस्थित होते.

## विविध जिल्ह्यांतील नेत्यांना थोरातांच्या पराभवाचे शल्य

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य, माजी प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब थोरात यांच्या भेटीसाठी राज्यभरातून काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांसह विविध क्षेत्रातील मान्यवर संगमनेरमध्ये दाखल होत आहेत. बाळासाहेब थोरात यांचा पराभव धक्कादायक असल्याने सहानुभूतीपोटी अनेकजण थोरातांच्या भेटी घेत आहेत.

बाळासाहेब थोरात हे मुंबई येथे काँग्रेस कमिटीच्या बैठकीसाठी उपस्थित राहिले. यानंतर तातडीने दिल्ली येथे काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, लोकसभेतील विरोधी पक्षनेते खासदार राहुल गांधी, खासदार सोनिया गांधी, खासदार प्रियंका गांधी यांच्यासह काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत झालेल्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीच्या बैठकीसाठी ते उपस्थित होते. त्यानंतर ते संगमनेर शहरात आले. थोरात यांनी तालुक्यातील काही गावांमध्ये जाऊन भेटी दिल्या. तर



गुंजाळवाडी येथील शेततळ्यात बुडून मृत्यू झालेल्या राजवीर जाधव यांच्या जाधव कुटुंबीयांना भेट देऊन त्यांचे सांत्वन केले.थोरात यांच्या भेटीसाठी अकोला, बाळापूर, जळगाव,चोपडा, अहमदनगर, नाशिक, ठाणे, सोलापूर, सांगली, उस्मानाबाद, शिर्डी, वैजापूर तसेच भंडारा जिल्ह्यातील काँग्रेस पक्षाचे अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. याचबरोबर शैक्षणिक, साहित्य व समाजकारणात निरपेक्ष भावनेने काम करणारे विविध संघटनांचे पदाधिकारी भेटीसाठी आले होते.जळगाव जिल्हा काँग्रेसचे माजी अध्यक्ष संदीप पाटील म्हणाले की, सर्वांसाठी विधानसभेचा निकाल हा अनपेक्षित आणि अनाकलनिय आहे. बाळासाहेब थोरात यांनी राज्यभर केलेले पारदर्शक आणि लोकाभिमुख काम यामुळे त्यांचे नेतृत्व हे राज्यातील कार्यकर्त्यांसाठी प्रेरणास्त्रोत आहे. याचबरोबर सततच्या रचनात्मक कामातून उभा केलेला संगमनेर तालुका आणि संस्कृत राजकारणाची पद्धत ही महाराष्ट्रासाठी दिशादर्शक ठरणारी आहे. संगमनेर तालुका जसा हळहळला तसा संपूर्ण महाराष्ट्र दुःखी आहे. परंतु येणाऱ्या काळामध्ये नव्या जोमाने तालुका पुन्हा राज्याचे नेतृत्व करेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी विविध कार्यकर्त्यांनी थोरात यांची भेट घेतली. तसेच तालुक्यातील प्रत्येक गावागावातील कार्यकर्ते पदाधिकारी कारखाना अतिथी गृह व सुदर्शन निवासस्थान, यशोधन या विविध ठिकाणी भेटीसाठी उपस्थित होते.

## राज्य उत्पादन शुल्क व पोलिसांच्या आशीर्वादाने अवैध दारू व्यवसाय तेजीत

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा** : शहरासह ग्रामीण भागात सुरू असलेल्या नशेच्या बाजाराने अनेकांचे संसार धुळीस मिळाले असून यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभाग आणि पोलिसांच्या 'आशीर्वादा'ने शहर आणि ग्रामीण परिसरात सुरू असलेला मद्यपींचा खुलेआम हैदोस जनता पाहत आहे, परंतु हा प्रकार एवढा खुलेआम सुरू राहतो कसा? असा प्रश्न सर्वसामान्यांच्या मनात आहे. त्याचे उत्तर आहे वरकमाईचे अर्थकारण! वाइन शॉप, बिअर शॉपी आणि मद्यपींच्या सोयीसाठी उघडलेले ढाबे, हॉटेल येथून मिळणाऱ्या 'वरकमाई'वर राज्य उत्पादन शुल्क (एक्साइज) आणि पोलिस विभाग मजेत आहे. या व्यवसायातील विश्वसनीय सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या दोन्ही विभागांचे अलिखित हप्त्याचे रेट कार्डच तयार आहे!

श्रीगोंदा शहर आणि ग्रामीण भागात नागरी वसाहतीमध्ये अनेक ठिकाणी बिअर शॉपी थाटण्यात आल्या आहेत. या बिअर शॉपीलाच बारचे स्वरूप शॉपीचालकांनी दिले. परिसरातील नागरिकांकडून सातत्याने तक्रारी आल्यानंतर त्याकडे पाहण्यास राज्य उत्पादन शुल्क आणि पोलीस यांना अर्थपूर्ण वेळ नसल्याचे दिसून येत असल्याचे वास्तव समोर आले. श्रीगोंदा शहरातील बिअर शॉपी, देशी-विदेशी दारू दुकानांच्या आजूबाजूला मद्यपींच्या पिण्याची सोय करण्यात आली आहे त्यामुळे येता - जाताना महिलांची मोठ्या प्रमाणात छेडछाड होते असे अनेक प्रकार घडलेले जनतेने पोहिले आहे मात्र भीतीपोटी अथवा बदनामी पोटी याबाबत पोलीस ठाण्यात तक्रार दाखल झालेल्या नाही मात्र यामुळे शहरात अनेकदा खळबळ उडाली. सायंकाळी श्रीगोंदा शहराच्या अनेक बाजूला 'मधुशाला' भरविण्यात येत होती. असे अनेक प्रकार खुलेआम सुरू असताना पोलिस आणि राज्य उत्पादन शुल्क विभाग मात्र अर्थपूर्ण दुर्लक्ष करत आहेत.त्यामुळे यातून अनेकांचे संसार मोडकळीस आले असून यातून राज्य उत्पादन शुल्क व पोलीस यांचे कर्तव्य कोमात जाऊन वरकमाई जोमात सुरू आहे.असे खुलेआम बोलले जात आहे तालुक्यातील अवैध ढाबे, पार्सल घेऊन बसता येणारे हॉटेल श्रीगोंदा शहर आणि ग्रामीण भागातअनेक ढाबे, हॉटेल या ठिकाणी अवैधरीत्या दारू खरेदी करून मद्यपी बसतात. त्यामुळे ही ठिकाणे फुल्ल चालतात. अशा ढाब्यांवर, हॉटेलांवर छापा न मारण्यासाठी 'कलेक्शन' म्हणजे हप्तेखोरी गोळा करण्यात येते.

**देशी आणि विदेशी दारूचे दुकान**

देशी-विदेशी दारू दुकानात केवळ मद्य परवाना असलेल्या ग्राहकाला दारू विक्री करण्याची परवानगी आहे. मात्र, सर्रास कोणालाही दारू विक्री करण्यात येते. इतर लायसन्सधारकांच्या परवान्यावर ही विक्री खपवली जाते. दुकानदार जेव्हा याबाबत मासिक विवरण एक्साइजला देतात, त्यावेळी या घोळाकडे दुर्लक्ष करणे, बुटलेगिंगच्या प्रकाराकडे दुर्लक्ष करणे.हा एक वरकमाईचा भाग असल्याची जोरदार चर्चा आहे

**हप्ते मिळण्यासाठी कारणे**

उशिरापर्यंत परमिट रूम चालवणे,मालात तफावत, दुसऱ्या बॅचचा माल,बनावट दारूच्या विक्रीकडे सर्रास दुर्लक्ष,रात्री उशिरापर्यंत शॉपी सुरू ठेवण्याची मुभा,बिअर शॉपीमध्ये दारू पिणाऱ्यांकडे लक्ष न देणे यासारख्या अनेक कारणामुळेच राज्य उत्पादन शुल्क आणि पोलिसानं हप्ते मिळतात अशीही जोरदार चर्चा ऐकण्यास मिळत आहे

**एक्साइज-पोलिसांचा वाटा ६०-४०!**

दारूच्या धंद्यात राज्य उत्पादन शुल्क विभागाची भूमिका महत्त्वाची तर पोलिसांची दुय्यम असते.यामध्ये ठराविक दुकानानुसार आणि धंद्यानुसार 'एक्साइज'चे कलेक्शन करणारे एजंट ठराविक भागात नेमण्यात आल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली. यामध्ये ज्या ठिकाणावरून कलेक्शन होते, त्या ठिकाणामध्ये पार्सल घेऊन बसण्याची ठिकाणे असलेले अवैध ढाबे, वाइन शॉप, परमिट रूम, देशी दारू दुकाने आदींचा समावेश आहे. यामध्ये 'एक्साइज'चे कलेक्शन जास्त म्हणजे साधारण ६० टक्के असून, पोलिसांचे 'कलेक्शन' साधारणपणे ४० टक्के असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

**महिन्याला हप्तेखोरीचा रेट**

आस्थापना एक्साइज विभाग पोलिस विभाग परमिट रूम ४ हजार ३ हजार,बिअर शॉपी ३ हजार दीड ते दोन हजार,अवैध ढाबे ४ हजार दोन ते अडीच हजार,वाईन शॉप तीन हजार आणि दोन हजार असे बेकायदेशीर दरफलक असल्याची सूत्रांकडून माहिती मिळाली आहे.

## चोरीच्या गाड्या शोधण्यासाठी राहुरी पोलिस ॲक्शन मोडवर

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : राहुरी शहर व तालुका परिसरात बऱ्याचशा चोरलेल्या दुचाकी गाड्या ह्या चोरांकडून अल्प दरात विकत घेऊन विना नंबर प्लेट वापरल्या जातात अशी माहिती मिळाल्याने राहुरी पोलीस स्टेशन ने काल दिन १ डिसेंबर रोजी विना नंबर प्लेट गाड्यांची तपासणी मोहीम हाती घेतली होती होती या मोहिमेदरम्यान ३० दुचाकी वाहने विना नंबर प्लेटची आढळून आली. सदर वाहनांवर २०,५०० रुपयांची दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे

कालच्या कारवाईतील ३० दुचाकी वाहनांपैकी २४ वाहनांवर दोन्ही बाजूच्या नंबर प्लेट बसवून वाहने मूळ मालकांच्या ताब्यात देण्यात आलेली



चोरीचे वाहन शोधण्यासाठी राहुरी पोलिसांनी विना नंबरच्या दुचाकी पकडून राहुरी पोलीस स्टेशन मध्ये आणून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई केली. (छाया राजेंद्र परदेशी)

आहे. राहिलेल्या वाहनांची कागदपत्रे अद्याप पर्यंत नागरिकांनी हजर न केल्याने ती वाहने राहुरी पोलीस स्टेशन येथे जमा आहेत. राहुरी पोलिसांनी राहुरी तालुक्यातील सर्व नागरिकांना आवाहन केले आहे की आपल्या दुचाकी व चार चाकी वाहनांवर पुढील व मागील दोन्ही नंबर प्लेट बसवून घ्याव्यात जेणेकरून विनाकारण दंड भरण्याची वेळ येणार नाही. तसेच सर्व नागरिकांनी नियम पाळून नंबर प्लेट बसविलेल्या असल्यास चोरीचे वाहन पोलिसांना शोधणे सोपे होईल .

सदर चोरीचे वाहन शोध मोहीम ही पोलीस अधीक्षक राकेश ओला अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबरमे उपविभागीय पोलीस अधिकारी बसवराज शिवपुजे यांच्या सूचनेनुसार पोलीस निरीक्षक संजय ठेंगे राहुरी पोलीस स्टेशन यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक, अमोल पवार, पोलीस उपनिरीक्षक धर्मराज पाटील, हनुमंत आव्हाड, संदीप ठाणगे, संजय राठोड, बबन राठोड, बापू फुलमाळी, प्रमोद ढाकणे, सचिन ताजने, सतीश कुऱ्हाडे, जालिंदर धायगुडे यांच्या पथकाने केलेली आहे.